रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २९६
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १४ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

‘क्षमता नसलेल्या राहुल गांधींना सत्तेपासून दूर ठेवा’/२
खालापुरात खून; अवघ्या २४ तासांत आरोपी अटकेत/५
आयपीएलमध्ये विराट कोहलीने रचला इतिहास!/८

# वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा महामुंबईला तडाखा

## काही ठिकाणी गारांचाही मारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर परिसरात सोमवारी (दि. १३) सोसाट्याचा वारा आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी गाराही पडल्या. उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांना या पावसामुळे थोडासा दिलासा मिळाला असला तरी जोरदार वाऱ्याने अनेक ठिकाणी पडझड होऊन नुकसान झाले आहे.

राज्यात या आठवड्यामध्ये दुपारी तापमानात वाढ होणार असून सायंकाळी मात्र अवकाळी पाऊस हजेरी लावणार, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. तो खरा ठरला असून सोमवारी दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दुपारी ३ वाजल्यापासून सोसाट्याचा वारा सुटल्याने धुळीचे लोट उठले होते. त्यानंतर पाऊस सुरू झाला. या पावसाचा जोर जास्त नसला तरी वाऱ्याचे प्रमाण अधिक होते.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असून दुपारीही बाजारात गर्दी दिसून येते. अचानक आलेल्या पावसाने खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची एकच धांदल उडाली. नागरिकांजवळ छत्र्या नसल्याने पावसापासून बचाव म्हणून त्यांनी आजूबाजूच्या दुकानाचा आसरा घेतला.

वारा पावसामुळे हवेत गारवा येऊन लोक सुखावले, मात्र सोसाट्याच्या वाऱ्याने अनेक ठिकाणी पडझड होऊन नुकसान झाले आहे. महावितरणकडून काही भागांत वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. दरम्यान, मावळ लोकसभा मतदारसंघातील घाटमाथ्याखालील मतदानावर वादळी पावसाचा काही प्रमाणात परिणाम दिसून आला.

# चौथ्या टप्प्यात देशात ६२.५६ टक्के मतदान

## मावळमध्ये ५२.३०, राज्यात ५२.४९% नोंद

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी (दि. १३) चौथ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली. आकडेवारीनुसार सायंकाळी ५ वाजेपर्यंत देशात सुमारे ६२.५६ टक्के, तर राज्यात ५२.४९ टक्के मतदान झाले. मावळमध्ये सरासरी ५२.३० टक्के मतदानाची नोंद झाली.

चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रासह देशातील १० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ९६ मतदारसंघाचा समावेश होता. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. दुपारी ऊन पडत असल्याने सकाळच्या वेळेस मतदान केंद्रावर लोक येत होते. दुपारी हा वेग काहीसा मंदावला, पण सायंकाळी पुन्हा गर्दी वाढली.




**चिंचवड : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी थेरगाव येथे आपला मतदानाचा हक्क बजावला.**

महाराष्ट्रातील नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, मावळ, अहमदनगर, पुणे, शिरूर, शिर्डी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या ११ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. मतदानासाठी प्रशासनाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.


दरम्यान, मावळ लोकसभा मतदारसंघात घाटमाथ्याखालील परिसरात जोरदार वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. त्याचा मतदानावर मतदान परिणाम झाला. कर्जतमध्ये अनेक मतदार मतदानांपासून वंचित राहिले आहेत. या मतदारांना वेळ वाढवून मिळावा किंवा त्यांच्यासाठी फेरमतदान घ्यावे, अशी मागणी महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

**राज्यातील लोकसभा मतदारसंघनिहाय सायंकाळी ५ वाजेपर्यंतची मतदान टक्केवारी**

| | |
|---|---|
| नंदुरबार | ६०.६० टक्के |
| जळगाव | ५१.९८ टक्के |
| रावेर | ५५.३६ टक्के |
| जालना | ५८.८५ टक्के |
| औरंगाबाद | ५४.०२ टक्के |
| मावळ | ४६.०३ टक्के |
| पुणे | ४४.९० टक्के |
| शिरूर | ४३.८९ टक्के |
| अहमदनगर | ५३.२७ टक्के |
| शिर्डी | ५२.२७ टक्के |
| बीड | ५८.२१ टक्के |

पनवेल, उरण : मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सोमवारी मतदान झाले. त्या अनुषंगाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, त्यांच्या पत्नी शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, स्वाती अविनाश कोळी, नवमतदार अमोघ ठाकूर, कोमल कोळी, चारुता कोळी यांनी मतदानाचा हक्क बजावला. त्याचप्रमाणे आमदार महेश बालदी यांनीही मतदान केले.








# मुंबईत महाकाय होर्डिंग कोसळून आठ जणांचा मृत्यू; बचावकार्य सुरू





**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत सोमवारी (दि. १३) दुपारी झालेल्या वादळी पावसाने दाणादाण उडवली. घाटकोपरमध्ये पेट्रोलपंपावर महाकाय असे होर्डिंग कोसळून अनेक गाड्या आणि लोक अडकले. यात आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची घोषणा त्यांनी केली आहे तसेच सर्व जखमींवर मोफत उपचार करण्यात येतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

घाटकोपरमधील घटना ताजी असतानाच वडाळ्यातसुद्धा पार्किंग टॉवर कोसळला.

# रायगडात यलो अलर्ट

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात सोमवारी (दि. १३) पुन्हा अवकाळी पावसाने हजेरी लावली. संध्याकाळच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडला. दरम्यान, हवामान विभागाने रायगडला १२ ते १६ मे असा पाच दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.

दक्षिण रायगडात माणगाव, गोरेगाव परिसरात पावसाने दुपारी हजेरी लावली, तर उत्तर भागात संध्याकाळी पाऊस पडला. कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग, पनवेल, उरण तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. काही ठिकाणी गाराही पडल्या. या पावसामुळे आंबा, भातपीकासह वीटभट्टी व्यवसायालाही फटका बसला आहे.

## निवडक

### गडचिरोलीत मोठी कारवाई; तीन नक्षलवाद्यांचा खात्मा

**भामरागड** : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी मोठी कारवाई करण्यात आली आहे. भामरागड तालुक्यीतल कत्रांगट्टा गावाजवळ सुरक्षा रक्षकांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले आहेत. यामध्ये एक पुरुष कमांडर आणि दोन महिला नक्षलींचा समावेश आहे. त्यांच्याकडून एके ४७, कारबाईन, इन्सास राफाईल्स ही अत्याधुनिक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

### निवडणूक वार्तांकनावेळी हार्ट अटॅक येऊन पत्रकाराचा मृत्यू

**बीड :** येथील लोकसभा निवडणुकीचे वार्तांकन करण्यासाठी मुंबई येथून अंबाजोगाई शहरात आलेले ’आज तक’ वृत्तवाहिनीचे व्हिडीओ जर्नलिस्ट वैभव कनगुटकर यांचे सोमवारी (दि. १३) हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने निधन झाले. त्यांच्या अकस्मात निधनाने पत्रकारिता विश्वासह कुटुंब आणि मित्र परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे.

# सीबीएसई दहावी, बारावीचा निकाल जाहीर; मुलींची बाजी

**मुंबई : प्रतिनिधी**


केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच सीबीएसई बोर्डाने इयत्ता दहावी आणि बारावीचा निकाल जाहीर केला आहे. दहावीचा निकाल ९३.६%, तर बारावीचा निकाल ८७.९८ टक्के इतका लागला आहे. विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका तसेच प्रमाणपत्र नंतर शाळा प्रशासनाकडून मिळेल.

सीबीएसई बोर्डातील १६ लाख ३३ हजार ७३० विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. यापैकी १६ लाख २१ हजार २२४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १४ लाख २६ हजार ४२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण ९३.६% विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.६५ टक्के अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदाही मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ही मुलांपेक्षा जास्त आहे. ९१.५२ टक्के मुली, तर ८५.१२ टक्के मुले पास झाले आहेत. मुलांच्या तुलनेत मुलींचा निकाल ६.४० टक्क्यांनी अधिक लागला आहे.

दहावीच्या परीक्षेसाठी २२ लाख ५१ हजार ८१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील २२ लाख ३८ हजार ८२७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातून २० लाख ९५ हजार ४६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा बारावीप्रमाणेच इयत्ता दहावीच्या एकूण उत्तीर्णतेचीही टक्केवारी वाढली आहे. यंदा निकालाची टक्केवारी ९३.६०% राहिली. मागील वर्षापेक्षा ती ०.४८ जास्त आहे. दहावीच्या परीक्षेतही मुलींनी मुलांपेक्षा २.०४ टक्क्यांनी चांगली कामगिरी केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहेत. अनेकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदान प्रक्रिया पार पडली. या वेळी करंजाडे येथे मतदानासाठी लागलेली मतदारांची रांग.



# क्षमता नसलेल्या राहुल गांधी यांना सत्तेपासून दूर ठेवा!

## धुळे येथील प्रचारसभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आवाहन

**धुळे : प्रतिनिधी**

गेल्या १० वर्षांची यशस्वी कारकीर्द आणि पुढील २५ वर्षांच्या देशाच्या प्रगतीचा स्पष्ट आलेख असलेल्या भाजपचे नेतृत्व करणारे नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवून देशाची जनता देशाच्या समृद्धीची, विकासाची वाटचाल सुरू ठेवणार आहे, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री तथा भाजप नेते अमित शाह यांनी सोमवारी (दि. १३) धुळे येथे व्यक्त केला. इंडिया आघाडी, राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करीत केंद्रीय मंत्री शाह यांनी विरोधकांच्या तुष्टीकरण धोरणाचे वाभाडे काढले.



धुळे मतदारसंघाचे भाजप महायुतीचे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ झालेल्या प्रचंड जाहीर सभेत बोलताना केंद्रीय मंत्री शाह यांनी मोदी सरकारच्या १० वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीचा संपूर्ण आलेखच जनतेसमोर मांडला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे, ज्येष्ठ नेते आमदार जयकुमार रावल, आमदार राहुल आहेर, माजी महापौर नाना करपे आदी या वेळी उपस्थित होते.

देशाच्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वपूर्ण आहे. देश कोणाच्या हाती सुरक्षित, समृद्ध राहणार याचा निर्णय जनतेला करावयाचा आहे. एका बाजूला १२ लाख कोटींचे घोटाळे करणारे काँग्रेस व इंडी आघाडी, आणि दुसऱ्या बाजूला आपल्या उभ्या कारकीर्दीत भ्रष्टाचाराचा एकही आरोप नसलेले नरेंद्र मोदी यांच्यातील ही लढाई आहे. एका बाजूला थोडासा उन्हाळा वाढताच बँकॉकला पळणारे राहुल गांधी आहेत, तर २३ वर्षांत एकही सुट्टी न घेता, दिवाळीतदेखील सरहद्दीवर जवानांसोबत दिवाळी साजरी करीत अखंडपणे देशसेवा करणारे पंतप्रधान मोदी आहेत. एका बाजूला चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेले राहुल गांधी आहेत, तर दुसरीकडे चहा विकणाऱ्या गरीबा घरी जन्मलेले नरेंद्र मोदी आहेत. या दोघांतून आपल्याला नेता निवडायचा आहे, असे शाह म्हणाले.

डॉ. भामरे यांना दिले जाणारे एक-एक मत नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी मोलाचे ठरणार आहे. मोदींनी देशाला सुरक्षित बनविले, समृद्ध बनविले, देशाची प्रतिष्ठा जगात उंचावली आहे.

याबरोबरच मोदी यांनी देशाला सुरक्षित बनविण्याचे काम केले आहे. काश्मीरमधील ३७० कलम रद्द करून मोदी यांनी काश्मिरला देशाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेतले. महाराष्ट्रातला प्रत्येक नागरिकही काश्मिरसाठी प्राण देण्यासाठी सज्ज आहे, याची काँग्रेसचे अध्यक्ष खर्गे यांना कल्पना नाही अशी खिल्लीदेखील त्यांनी उडविली.

धुळे जिल्ह्यात सहा महामार्गांचे काम वेगाने झाले आहे, केवळ धुळ्यात साडेतीन लाख घरांत नळाचे पाणी मोदीजींच्या संकल्पातून पोहोचले, रखडलेले अनेक सिंचन प्रकल्प सुमारे २५०० कोटी रुपये खर्चून धुळ्याची पाणी समस्या सोडविण्याचे काम देवेंद्र फडणवीस व डॉ. भामरे यांनी केले आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रात चार हजार कोटींची योजना आखली असून आचारसंहिता संपताच शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम थेट जमा होईल, अशी ग्वाहीदेखील शाह यांनी दिली.

# कर्जत तालक्यात गारपीट; जनजीवन विस्कळीत

**कर्जत : प्रतिनिधी**



तालुक्यातील नेरळ परिसरात सोमवारी (दि.१३) दुपारी ३ वा.च्या सुमारास गडगटासह धुवाधार पाऊस पडला. नेरळ भागातील जिते गावाच्या परिसरात गारपीट झाली. सुमारे दोन तास पाऊस पडत असल्याने मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाला, तसेच या पावसाने विट उत्पादकांचे नुकसान झाले. काही ठिकाणी रस्त्यांवर झाडे पडल्याने काही वेळ रस्ते बंद झाले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

वारे, कळंब, कशेळे भागात दुपारी मतदान केंद्रांवर गर्दी असताना तीनच्या सुमारास गडगडाट सुरू झाला आणि अवघ्या काही मिनिटांत पावसाने जोरदार सुरुवात केली. कर्जत तालुक्यात बहुतांश भागात दोन तास धुवाधार पाऊस पडला. त्यामुळे संध्याकाळी मतदानासाठी जाणाऱ्या मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवल्याने मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाला.

गावागावातील रस्ते पाण्याने भरले होते. वीट उत्पादकांच्या कच्च्या विटांचे नुकसान झाले.

# मुंबई-गोवा महामार्गावर ट्रकच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**महाड** : मुंबई-गोवा महामार्गावर सोमवारी (दि.१३) सायंकाळी एका वृद्ध व्यक्तीला रस्ता ओलांडताना टँकरची धडक लागल्याने त्याचा मृत्यू झाला आहे.

मुंबई गोवा महामार्गावर सायंकाळी ५ वा.च्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय चांभारखिंड येथे महामार्ग ओलांडून जात असताना किसन लक्ष्मण मोरे (वय ७०) यांना मुंबईकडून येणारा टँकर (एमएच ४३ बीएक्स ०८३८)ची धडक लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतले आहे. करोडो रुपये खर्चून या ठिकाणी महामार्ग विभागाने दोन स्कायवॉक उभारले आहेत, मात्र यांचा उपयोग होत नसून पादचारी आपला जीव धोक्यात घालत आहेत. यासाठी महामार्ग विभाग व वाहतूक विभागाकडून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

# दुचाकीस्वाराला उडवून पर्यटकांचे पलायन

## कारचा पाठलाग करून ग्रामस्थांनी दिला चोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागजवळील नागाव येथे अपघात व शिवीगाळ करून पुण्याकडे निघालेल्या पर्यटकांना संतप्त ग्रामस्थांनी पाठलाग करीत चोप दिला. अपघातात दोन ग्रामस्थ जखमी झाले, तर पाच पर्यटक मारहाणीत जखमी झाले. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमी ग्रामस्थांच्या उपचारानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबतचे वृत्त असे की, पुणे आणि नाशिकमधील पाच जण पर्यटनासाठी अलिबागला आले होते. ते ब्रिझा कारने (एमएच १२ सीई ००७१) नागाव येथून पुण्याकडे जात असताना अलिबागजवळ आले असता रात्री १०.३० वा. च्या सुमारास त्यांच्या कारची ठोकर एका दुचाकीला लागली. या वेळी कारचालक आकाश लोखंडे याने मोटरसायकलस्वाराला शिवीगाळ केली. हा प्रकार कळताच संतप्त ग्रामस्थांनी त्यांना जाब विचारला असता त्यांनी कार पुढे पळवली.

चेकपोस्टवर गावातील लोकांनी ही गाडी अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र पर्यटकांनी कार वेगाने नेत कार्ले गावात आणखी एका मोटरसायकलला कारने ठोकर दिली. यात तो जखमी झाला. यामुळे पाठलाग करणारे लोक आणखी संतापले आणि त्यांनी पाठलाग करून कार अडवली.

या वेळी गावातील लोकांनी पळणाऱ्या पर्यटकांना पकडून मारहाण केली. यात कारचेही नुकसान केले. या प्रकरणी अज्ञात २५ ते ३० ग्रामस्थांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी या गाडीचा वाहनचालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत असल्याचा आरोप केला आहे.

# याद्यांमधून नावे वगळल्याने मतदार मतदानापासून वंचित



**पनवेल : प्रतिनिधी**

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदान सोमवार (दि.१३) रोजी सकाळी ७ वा. पासून सुरू झाले. पनवेल शहरात सकाळपासून मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. अनेक मतदारांची नावेच वगळल्याने मतदार मतदानापासून वंचित राहिले.

> **जो मतदार ज्या घरामध्ये राहात असेल आणि जेवण बनवत असेल तर त्या त्याचे त्या पत्त्यावर मतदार नाव असते. अनेक मतदार दुसरीकडे राहतात. आमची बीएलओ त्या ठिकाणी तीन वेळा भेट देतात. त्या वेळी तो तेथे नसल्यास त्याचे नाव यादीतून रद्द केले जाते. मतदार मतदानाच्या दिवशी यादी येऊन बघतात. त्या वेळी नाव नसल्याची तक्रार करतात. आमचे बीएलओ सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना सोसायटीत येऊन मतदार नोंदणी करणार असल्याची कळवतात, पण सोसायटीचे पदाधिकारी त्याची दखल घेत नाहीत. ओळखपत्र असूनही नीट वागणूक देत नाहीत. त्यामुळे नावे मतदार यादीतून वगळण्यात येतात.**
>
> **-विजय पाटील, तहसीलदार, पनवेल**

मावळ लोकसभा मतदार संघात येणाऱ्या पनवेल महापालिका हद्दीत सकाळपासून गर्दी होती. निवडणूक मतदानासाठी प्रशासनाच्या वतीने काही ठिकाणी वगळता मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम्प, उन्हाळ्याची स्थिती लक्षात घेता औषधे, पाच पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या मतदान केंद्रावर बैठकव्यवस्था, उन्हाळा लक्षात घेता मंडप उभारणी आदी सुविधेसोबतच इतर तांत्रिक बाबींची पूर्तता होती.

पनवेलमध्ये राहून अनेक वर्षे मतदान करणाऱ्या व्यक्तींची नावेच वगळण्यात आली होती.

# शेळ्या-मेंढ्यांची अवैध वाहतूक; दोघांवर गुन्हा

**पनवेल :** प्रमाणापेक्षा जास्त शेळ्या मेंढ्या ट्रकमध्ये भरून त्यांना क्रूरपणे वागणूक देऊन त्यांच्या अन्नपाण्याची व प्रथमोपचारची व्यवस्था न करता अवैध वाहतूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर पोलीस ठाणे हद्दीतून ले लँड ट्रक (जीजे ०१ एचटी ६१३३) आणि जीजे ०१ केटी ८३९३मधून बकऱ्यांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी हीरानंदनी ब्रिज येथे दोन्ही वाहनांची तपासणी केली.

आतमध्ये बकरे आणि मेंढ्या आढळून आले. त्यांच्या वाहतुकीबाबत, परवानाबाबत विचारले असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याचे सांगितले व बकरे व मेंढ्या अहमदाबाद गुजरात येथून खरेदी करून कर्नाटक येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. खरेदीबाबत त्यांनी कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत.

फारूक मोहम्मद शेख (रा. गुजरात) भूमा ओंकार राम (रा. राजस्थान) याच्याकडील दोन ट्रकमध्ये प्रमाणापेक्षा जास्त मेंढ्या भरून त्यांना क्रूरपणे वागणूक देऊन त्यांची अन्नपाण्याची व प्रथमोपचाराची व्यवस्था केली नाही.

दोन्ही ट्रकमधून ३१० शेळ्या- मेंढ्यांची डांबून, कोंबून भरून अवैध वाहतूक करत असताना मिळून आल्याने दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नवी मुंबईत वादळी वाऱ्याने रस्त्यावर पालापाचोळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सोमवारी (दि.१३) दुपारनंतर सुरू झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शहरात ठिकठिकाणी ३०हून अधिक झाडे उन्मळून पडल्याची घटना घडली. ही झाडे काही ठिकाणी कार तसेच अन्य वाहनांवर पडून वित्तहानी झाली. सुदैवाने या कोणत्याही दुर्घटनेत जीवित हानी किंवा कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती नवी मुंबई महानगरपालिका आपत्कालीन विभागाच्या माध्यमातून देण्यात आली. या वादळामुळे शहरातील रस्त्यांवर पालापाचोळ्याचे ढीग साचले होते.

एलआयजी भागामध्ये घरांवरील प्लास्टिक तसेच अन्य साहित्य उडून खाली पडले होते. सुदैवाने यामध्येही कोणी जखमी झाले नाही.

नवी मुंबई शहरामध्ये सोमवारी दुपारी ३.३० वाजल्यानंतर अचानकपणे ढग दाटून आले आणि वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. शहरात ठिकठिकाणीच्या विभागांमध्ये या वाऱ्यामुळे वाशी, सानपाडा, कोपरखैरणे, ऐरोली, बेलापूर, नेरूळ, दिघा आदी परिसरात अनेक झाडे उन्मळून पडले तर काही ठिकाणी झाडांच्या जीर्ण झालेल्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. दोन ठिकाणचा अपवाद वगळता ही झाडे व मोठमोठ्या फांद्या रस्त्यावरती पडताना त्या ठिकाणी कोणीही नव्हते. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही किंवा कोणीही जखमी झाले नाही.

ठाणे- बेलापूर रोड वरील बेलापूर वाहिनीवर सविता केमिकल जवळ वादळामुळे इलेक्ट्रिक पोल रस्त्यावर होता. त्यामुळे या परिसरात काहीवेळ वाहतूक कोंडी झाली होती. नवी मुंबई वाहतूक पोलीस विभागामार्फत त्वरित यावर मार्ग काढण्यात आला. यामध्ये अवजड वाहनांसाठी मार्ग बदल करण्यात आला होता. पनवेल व बेलापूर जाणारी जड व अवजड वाहने पावणे सिग्नल वरून डाव्या बाजूने व्हाईट हाऊस-शालिमार चौक-महापे एमआयडीसीमार्गे वळवण्यात आली होती, तसेच हलकी वाहने पावणे गाव ब्रिज वरून वळवण्यात आली होती, अशी माहिती पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिली.

# सीईओपीमधील मतदान केंद्र ठरले आगळेवेगळे



**पुणे : प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथील सीईओपी मतदान केंद्र युनिक मतदान केंद्र ठरले आहे. मतदान केंदात प्रवेश करताच पांढऱ्या शुभ्र पडद्यांवर इतिहासाची साक्ष देणारे पोस्टर लक्ष वेधून घेतात. ही पोस्टर सीईओपीचा इतिहास, माहिती देतात. पुण्याचा सांस्कृतिक इतिहासालाही उजाळा देतात. त्यामुळे हे मतदान केंद्र मतदारराजाचे लक्ष वेधून घेत आहे.

शहरी मतदारांचा मतदानाला मिळणारा कमी प्रतिसाद निवडणूक आयोगासह प्रशासनासमोरील प्रश्न बनला आहे. मतदान केंद्रांवर प्रौढ, ज्येष्ठ मतदार दिसून येतात पण, तरुणाई दिसून येत नाही. त्यामुळे तरुण मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती व्हावी, आवड निर्माण व्हावी म्हणून पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीईओपी) युवा संसद क्लबच्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम निवडणूक आयोगाच्या संयुक्त विद्यमाने सुरू केल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष स्वप्नील क्षीरसागर यांनी दिली. आलेल्या मतदारांना तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, यासाठी सीईओपीच्या विद्यार्थ्यांनी त्यांनी तयार केलेले भिंत चढणारा रोबोट, विद्यापीठातील निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी ईव्हीएम मशीन, ऑल टेरेन व्हेइकलदेखील ठेवली आहे.


# पोलीस भरतीसाठी एकाच ठिकाणी सहभाग अनिवार्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यात होणाऱ्या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना एकाच जिल्ह्यातून आणि कोणत्याही एकाच घटकात सहभागी होता येणार आहे. एकाच पदासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यांत अर्ज भरलेल्या उमेदवारांनी कोणताही एक जिल्हा निवडून पोलीस अधीक्षक कार्यालयात हमीपत्र द्यावे, अशी सूचना गृहखात्याने दिली आहे.

राज्यात सुमारे १७ हजार पोलिसांची भरती प्रक्रिया होत आहे. यासाठी उमेदवारांनी वेगवेगळ्या जिल्ह्यांसाठी अर्ज भरले आहेत, असे गृह विभागाच्या निदर्शनास आले आहे. उमेदवारांनी एकाच पदासाठी वेगवेगळ्या ठिकाणी अर्ज केल्याने भरती प्रक्रियेनंतर काही जागा रिक्त राहतात. यातून प्रतीक्षा यादीतील काही विद्यार्थ्यांचे नुकसान होते. असा धोका टाळण्यासाठी उमेदवारांना कोणत्याही एकाच जिल्ह्यातून भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

यासाठी एका जिल्ह्याची निवड करून तसे हमीपत्र उमेदवाराने तो राहत असलेल्या जिल्ह्यात पोलीस अधीक्षक कार्यालयात द्यावे, अशी सूचना प्रशिक्षण व खास पथके विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीणकुमार पडवळ यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे. हमीपत्र भरण्याची अंतिम मुदत १७ मेपर्यंत आहे. त्यानंतर येणारे अर्ज बाद होतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



## दुखवटा

### आप्पा पाटील

**खोपोली** : नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ आप्पा उर्फ चंद्रकांत बाळकृष्ण पाटील यांचे ७६व्या वर्षी निधन झाले. महिंद्र स्टील कारखान्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी दुधाचा व्यवसाय केला. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले व दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांना अमरधाम येथे ग्रामस्थांतर्फे सुरेश खरपुडे तर महेंद्र स्टील कंपनीतर्फे रवींद्र कांबळे यांनी श्रद्धांजली वाहिली.



### जगन्नाथ पाटील

**अलिबाग** : तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेल अध्यक्ष जगन्नाथ गोमा पाटील यांचे रविवारी (दि.१२) रात्री अकस्मात निधन झाले. ते ७० वर्षांचे होते.



जगन्नाथ पाटील यांना सारे ज. गो. पाटील गुरुजी म्हणून ओळखत होते. ते गेली अनेक वर्षे राजकीय क्षेत्रांत सक्रिय होते. मागील काही वर्षे काँग्रेसचे काम त्यानी केले. कावाडे येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी अलिबाग मुरुड चणेरा अध्यक्ष अमित नाईक, प्रदेश काँग्रेसचे सचिव प्रवीण ठाकूर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर, रवी ठाकूर, समीर ठाकूर तसेच राष्ट्रवादीचे वैभव पाटील, धनंजय मोकल, सुनील पाटील, अजित मोकल, निलेश ठाकूर, सरपंच सारळ अमृता नाईक, सरपंच रेवस मच्छिंद्र पाटील, उपसरपंच संजय पाटील, अल्पेश पाटील, तेजस पाटील, दीपक पिंपळे उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे, भाऊ असा मोठा परिवार आहे.

# पनवेलमध्ये मतदान उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मतदान केंद्रांना भेटी

















**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघात सोमवारी (दि. १३) मतदान प्रक्रिया झाली. मावळ लोकसभा मतदारसंघ अंतर्गत पनवेल विधानसभा क्षेत्रात भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठिकठिकाणी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. या वेळी त्यांनी मतदारांसह कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले. त्यांनी कोपरा, खारघर, कामोठे, कळंबोलीमधील मतदान बूथ केंद्रांना भेट देऊन संवाद साधून आढावा घेत मतदान करण्याचे आवाहन केले.

या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, निलेश बावीस्कर, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका मोनीका महानवर, प्रमिला पाटील, संजना कदम, रूचिता लोंढे, अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष अजय कांडपिळे, रामा महानवर, समीर कदम, दिलीप बिस्ट, युवा नेते हॅप्पी सिंग, हरजींदर कौंर, भाजप युवा नेते शुभ पाटील, समीर मोरे, पंकज अष्टिकर, प्रकाश घोडेकर, पराग करले, गणेश नाईक, परेश कापसे, गौरव कांडपिळे आदी उपस्थित होते.




पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ठिकठिकाणी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. या वेळी त्यांनी मतदारांसह कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भाजप नेते प्रल्हाद केणी व त्यांच्या पत्नी यांनी मतदानाचा हक्क बजावला.

## ८५ वर्षीय आजीने केले मतदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिडलक्लास हौंसिंग सोसायटीमधील ब्रान्स शाळेतील युवा मतदान केंद्रात ८५ वर्षीय सरला रमणलाला बालड यांनी मतदान करून आपले कर्तव्य बजावले. मावळ लोकसभा मतदार संघात मतदानाला मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभला असून शांततेत मतदान प्रक्रिया झाली.



या निवडणुकीत मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभला असून अनेकांनी मतदान करुन लोकशाहीच्या उत्सवात सहाभगी होत मतदान केले. यामध्ये ज्येष्ठ नागरीकांचाही चांगला प्रतिसाद लाभला. यामध्ये मावळ लोकसभा निवडणुकीसाठी पनवेल शहरातील मिडल क्लास हौंसिंग सोसायटीतील बॉन्स शाळेतील मतदान केंद्रामध्ये ८५ वर्षीय ज्येष्ठ सरला रमणलाला बालड यांनी मतदान केले.

## दुखापतग्रस्त असूनही अभिजित साखरे यांनी बजावला मतदानाचा हक्क



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एक कर्तव्यदक्ष नागरिक असलेल्या अभिजित साखरे याने चालता येत नसतानाही मावळ लोकसभा निवडणुकीत ॲम्ब्युलन्सद्वारे मतदान केंद्रावर पोहचून आपला मतदानाचा हक्क बजवाला आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक पक्षाच्या वतीने मावळ लोसकभा निवडणुकीसाठी जोरदार प्रचार करण्यात आला. या प्रचारादरम्यान पहिल्या मजल्यावर पडून शिवसेनेचे पनवेल शहर संघटन अभिजित साखरे हे जखमी झाले असून त्यांच्या कंबरेला दुखापत झाली होती. त्यामुळे त्यांना चालता येत नव्हते. दरम्यान, यंदाची ही निवडणूक तरुणांच्या भविष्यासाठी महत्वपूर्ण असल्याने आपले कर्तव्य असलेलेल्या मतदाना हक्क बजावण्यासाठी अभिजित साखरे यांनी शिवसेनेचे पनवेल महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या भावनांची दखल घेत प्रथमेश सोमण यांनी ॲम्ब्युलंस उपलब्ध करुन त्यांना पनवेलमधील व्ही.के. हायस्कूलमधील मतदान केंद्रावर आणले.

या वेळी अभिजित साखरे यांनी मतदान करून सर्वांनी या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होत मतदानाचा हक्क बजावा, असे आवाहन केले.

## उरण येथे मतदान प्रक्रिया शांततेत पार

**उरण : वार्ताहर**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान सोमवारी (दि. १३) मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शांततेत झाले. नागरिकांनी सकाळीच रांगा लावून मतदान केले. अपंगांनी व वयस्कर मंडळींनी सकाळीच मतदान करून मतदानाचा हक्क बजावला.

उरणचे आमदार महेश बालदी यांनी मतदान करून मतदानाचा हक्क बजावला. ठिकठिकाणी मतदान बूथ वर कार्यकर्ते, हितचिंतक व विविध पक्षाचे कार्यकर्ते मतदान करण्यासाठी नागरिकांना सहकार्य करतांना दिसत होते. ठिकठिकाणी मतदान बूथवर मतदारांना मतदान केंद्र, मतदान क्रमांक, सांगून सहकार्य करतांना दिसत होते.

उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांच्या मार्गदर्शना खाली प्रत्येक बूथ जवळ व ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त कडक ठेवण्यात आला होता.



## श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे तिसावे पुष्प झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड येथील स्वरा किंबहुने या बालगायिकेने आपली गायन सेवा सादर केली. विदुषी अपूर्वा गोखले यांची शिष्या असलेल्या व अवघे नऊ वर्षे वय असलेल्या स्वरा हिने आपल्या मधुर गायकीने रसिक पनवेलकरांना मंत्रमुग्ध केले. संगीत सभेचा प्रारंभ तिने राग भीमपलास मधील 'अब तो बड़ी बेर' या बड़ा ख्यालाने केला. नंतर तिने 'ना मैं खेलुंगी होरी कान्हा संग' ही ठुमरी सादर केली. त्यानंतर तिने हंसध्वनी रागात 'जानी जानी री जग की ये रीत' हा तराणा सादर केला. यानंतर गणेश स्तवन, कौसल्येचा राम, बाई मी विकत घेतला शाम, मी पुन्हा वनांतरी, नारायणा रमारमणा, ही भक्तीगीते व नाट्यपदे गावून रसिकांची प्रशंसा प्राप्त केली. नंतर तिने 'बाजे किशन की' या भैरवीने संगीत सभेची सांगता केली.




स्वराचे आई-वडील मोनिका व अजित किंबहुने यांनी तिला संवादिनी व तबलासाथ केली. गणेश घाणेकर यांनी ताल वाद्यसाथ केली. गजानन घाणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मठातील साधक व आयोजकांनी संगीत सभा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

## पनवेलमधून मुक्या जनावरांची चोरी

**पनवेल :** परिसरातून तीन मुक्या जनावरांची चोरी केल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तालुक्यातील देहरंग येथील सत्कर्म श्रद्धा गो शाळेतून अज्ञात चोरट्यांनी एक बैल चोरून नेला आहे, तर दुसऱ्या घटनेत चिंध्रण गावातील एका घराबाहेर बांधलेल्या दोन बैलांची चोरी करण्यात आली आहे. या तीन जनावरांची किंमत जवळपास पंधरा हजार रुपये इतकी आहे. याबाबतची तपास सुरू आहे.

## संपादकीय

# पदार्पणातच फटका

राज्यात गेल्या चार दिवसांपासून निरनिराळ्या भागात अवकाळी पावसाचा तडाखा जाणवत असतानाच मुंबई व आसपासच्या परिसरातही दोन दिवस अवकाळी पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली होती, पण हा अवकाळी पाऊस धुळीच्या वादळासह असे रौद्र रूप घेऊन येईल असे मात्र कुणालाच वाटले नव्हते.

**मुंबई महानगर आणि आसपासच्या परिसराला सोमवारी दुपारी तीन वाजल्यापासून वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने जोरदार झोडपले. हवामान विभागाने दोन दिवसांसाठी पावसाचा इशारा दिलेलाच होता, पण तो पाऊस असा धुळीच्या वादळासह आणि जोरदार वाऱ्यासह येईल अशी कल्पना कुणीच केली नव्हती. त्यामुळेच दुपारच्या वेळी अचानक धुळीचे लोट उठल्यानंतर अनेक ठिकाणी लोकांना पावसाच्या तडाख्यात अडकून पडणे अनुभवाला आले. मुंबईतील पूर्व उपनगरांचा मोठा भाग तसेच पश्चिम उपनगरांतही वादळी वाऱ्याचा तडाखा जाणवला. वादळी वाऱ्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने मुंबई विमानतळावरील वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाला. मुंबई विमानतळाचा रनवेही परिणामी काही काळासाठी बंद करण्यात आला. या वादळी पावसाची तीव्रता इतकी होती की मुंबईतील मेट्रो सेवाही ठप्प झाली. मुंबईबाहेर काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाल्याची माहिती मिळाली. ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर भागात वादळी वाऱ्यासह आलेल्या जोरदार पावसामुळे वीज पुरवठ्याला फटका बसल्याचे दिसले. कर्जत-खालापूर या भागामध्ये गारांसह जोरदार पाऊस झाल्याचे समजले. या वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली तर मुंबईत दोन ठिकाणी मोठ्या दुर्घटना घडल्याचे समोर आले. घाटकोपर येथे एक महाकाय होर्डिंग पेट्रोल पंपाच्या परिसरावर कोसळून अनेक लोक त्याखाली अडकले. यात पावसामुळे होर्डिंगच्या आडोशाला उभ्या राहिलेल्या लोकांचाही समावेश असावा. पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या काही गाड्या या होर्डिंगखाली चेपल्या गेल्या. मुख्यमंत्र्यांनी तातडीने परिस्थितीची माहिती घेऊन दुर्घटनेत अडकलेल्यांची सुटका करून त्यांना शिताफीने वैद्यकीय मदत पुरवली जाईल असे आश्वासन दिले. जेसीबी आणि क्रेनची मदत घेऊन ते महाकाय होर्डिंग उचलण्याचा प्रयत्न तातडीने सुरू करण्यात आला. संध्याकाळी सात वाजेपर्यंत या दुर्घटनास्थळावरून जवळपास ४७ जणांना बाहेर काढण्यात आले. अनेकांना जवळच्या राजावाडी इस्पितळात तातडीने वैद्यकीय सुविधाही पुरविण्यात आली. परंतु होर्डिंगखाली त्यानंतरही काही लोक अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात होती. त्या दुर्घटनाग्रस्तांचा एकूण आकडा हे होर्डिंग उचलले गेल्यानंतरच समोर येऊ शकणार आहे. हे होर्डिंग नेहमीच्या संमत आकारापेक्षा मोठ्या आकाराचे होते व ते बेकायदा रीतीने लावले गेले होते अशीही माहिती समोर आली. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी महिनाभरापूर्वीच त्यासंदर्भात तक्रार केली होती व त्यामुळे दोनच दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाने होर्डिंग मालकाला नोटिस बजावली होती अशी माहिती समोर आली. या होर्डिंगच्या आसपासची झाडे होर्डिंग मालकाने केमिकल टाकून मारली होती. त्यामुळे त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्याची मागणी सोमय्या यांनी आधीच केली होती. अन्य एका घटनेत वडाळा येथे पार्किंग टॉवर कोसळून काही वाहने त्याखाली अडकली. येथेही काही जणांना तातडीने बाहेर काढण्यात आले तर चारपाच गाड्यांचे मोठे नुकसान झाले. खरे तर उष्मा असह्य झाल्याने लोक सुखावणाऱ्या पावसाची वाट पाहात होते, पण हा अवकाळी पाऊस आपल्या रौद्र रूपाचीच झलक दाखवून गेला.**

# आधुनिक स्वच्छतादूत आप्पासाहेब धर्माधिकारी

ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी याचे मूळ नाव दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी आहे. त्यांचा जन्म १४ मे १९५१ मध्ये झाला होता. हे एक महाराष्ट्रतील भारतीय समाजसेवक आहेत. आप्पासाहेब धर्माधिकारी हे नानासाहेब धर्माधिकारी यांचे पुत्र आहेत. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पावलावर पाऊल टाकत आप्पासाहेब हे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, निशुल्क रक्तदान शिबीर, रोजगार मेळावे, स्वच्छता मोहीम, अंधश्रद्धा निर्मूलन, अनेक व्यसनमुक्ती केंद्र इत्यांदी कार्यक्रम आयोजन त्यांनी केले. २०१४ मध्ये मध्ये डी.वाय पाटील विद्यालय नेरुळ यामध्ये त्यांना विद्यालंकार हि पदवी देऊन त्यांना सन्मानित केले होते. २०१७ यामध्ये ते सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान पुरस्कार पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले होते.

आप्पासाहेब धर्माधिकारी हे रायगड जिल्यात समाजसेवेचे काम करत असून जेष्ठ निरूपकार म्हणून ओळखले जातात. राज्यभरात लाखोंच्या संख्येने त्यांचे अनुयायी असून रेवदंडा या त्याच्या कर्मभूमीत नेहमीच गर्दी असते. आप्पासाहेब धर्माधिकारी हे महाराष्ट्रातील ओळखले जाणारे महत्वाचे समाजसेवक आहेत. अनेक राज्यातील पक्ष पार्टीमधील नेते त्यांना आणि त्याच्या कुटूंबाना गुरू मानतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही ते गुरू आहेत. यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्ती आप्पासाहेब धर्माधिकारी यांना आपले गुरू मानून त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी रेवदंडा येथील निवासस्थानी भेट देत असतात.



अलीकडच्या काळातील मोठ्या सामाजिक परिवर्तनाच्या यशस्वी चळवळीचे प्रत्यंतर देत आले आहे. धर्माधिकारी घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी त्याचे वडील नानासाहेब धर्माधिकारी हे सुद्धा समाजसेवक होते. धर्माधिकाऱ्यांच्या घरामध्ये हि परंपरा चारशे वर्षांपासून चालू आहे. नानासाहेब धर्माधिकारी याना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्या आले आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार, महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार अश्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे आणि त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण या पुरस्काराने गौरवीत करण्यात आले. जेव्हा हा पुरस्कार त्यांना देणार होते त्यावेळी खारघर येते ५१० एकर च्या जमिनीत चाळीस लाखांहून अधिक लोक जमा झाले होते. या गर्दीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड यामध्ये झाली आहे.

**वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार**

हवामानातील बदल आणि त्याचे तापमानावर होणारे परिणाम लक्षात घेऊन वृक्षलागवड करून त्यांची जोपासना करण्याचे कार्य नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने हाती घेण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने २०१५ ते २०२१ या कालावधीत एकूण ३६ लाख ६१ हजार ६११ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तीन लाख २१ मनुष्यबळ वापरण्यात आले. या वृक्षांची जोपासनाही श्री सदस्यांकडून केली जात आहे. आंतरिक स्वच्छतेबरोबर परिसर स्वच्छतेला महत्त्व द्यायला हवे, अशी शिकवण अप्पासाहेबांनी आपल्या अनुयायांना दिली. या शिकवणीतून नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने स्वच्छता मोहिमेला सुरवात केली. रस्ते, नाले, गाळाने भरलेले तलाव, समुद्र किनारे यांची स्वच्छता करण्याचे कार्य श्री सदस्यांनी हाती घेतले. गावाच्या वेशीपासून सुरू झालेला हा उपक्रम हळुहळू शहरांच्या चौकाचौकांपर्यंत येऊन पोहचला. प्रतिष्ठानच्या वतीने आत्तापर्यंत १४० स्वच्छता अभियाने राबविण्यात आली. २० लाख २३ हजार ३६९ श्री सदस्य सहभागी झाले. एक लाख १५ हजार २३ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या शिवाय विहिरीचे पुनर्भरण, जलस्रोतांची स्वच्छता, निर्माल्य संकलनातून खत निर्मितीचे उपक्रम राबविले आहेत. आध्यात्माला सामाजिक उपक्रमांची जोड दिल्याने लाखो अनुयायी त्यांच्या कार्यात जोडले गेले आहेत.

**मिळालेले पुरस्कार**

अप्पासाहेबांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डी. वाय. पाटील विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. माजी राज्यपाल विद्यासागर राव यांनी त्यांची राज्याचे स्वच्छता दूत म्हणून नियुक्ती केली होती. तर २०१७ मध्ये केंद्र सरकारने पद्मश्री हा नागरी सन्मान देऊन सन्मानित केले. युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टिट्युटने अप्पासाहेबांना लिव्हिंग लिजंड पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या या कारकिर्दीची दखल घेऊन राज्य सरकारने गेल्या वर्षी त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले. **(साभार : इंटरनेट)**

# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा आपल्या खांद्यावर समर्थपणे वाहिली ती छत्रपती संभाजी राजे यांनी आज छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या जशा अनेक गाथा सांगितल्या जातात त्याचप्रमाणे एका गद्दार व्यक्तीमुळे त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

छत्रपती संभाजीराजे औरंगजेबाच्या तावडीत जिवंत सापडले आणि त्यांनी धर्म परिवर्तनाला नकार दिल्यामुळे औरंगजेबाने त्यांचे केलेले हाल आणि त्यांची हत्या याबद्दल हळहळ व्यक्त केली जाते, मात्र या महापराक्रमी व्यक्तीने आपल्या जेमतेम नऊ वर्षांच्या स्वराज्याच्या कारकीर्दीत मोगल, गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना चांगलंच जेरीस आणल होते.

संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. संभाजी राजांच्या आईसाहेब सईबाईंचं अकाली निधन झालं. त्यानंतर माता जिजाऊंनी संभाजी महाराजांच्या पालनपोषणाकडे लक्ष दिले. जिजाऊंसोबत पुण्याजवळील कापूरहोळ येथील धाराऊ नावाच्या महिलेने महाराजांचे संगोपन केले.

वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी संभाजी महाराज स्वराज्याचे युवराज



तर केवळ २३व्या वर्षी स्वराज्याचे छत्रपती झाले. राजकारण अगदी कमी वयातच शिकण्याची संभाजी महाराजांची जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे त्यांनी मुघल दरबार आणि तिथं होणारं राजकारण कसं असतं हे अगदी बालपणीच पाहिलं होतं.

केवळ चौदाव्या-पंधराव्या वर्षी संभाजी राजांनी साहित्य, कविता यांच्यात रस घेतला आणि याच काळात छत्रपती संभाजी महाराज संस्कृत पंडित झाले. बुधभूषणम या संस्कृत ग्रंथासह इतर भाषेतले तीन ग्रंथही छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहीले.

छत्रपती शिवाजी महाराजांसोबत वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी संभाजी राजे आग्र्याला गेले. त्यानंतर आग्र्याहून सुटकेचा एकएक क्षण त्यांनी आपल्या पित्यासोबत अनुभवला. आग्रा येथून सुटका करून घेऊन शिवाजी राजे मजल दरमजल करत राजधानीत परतले. पण सुरक्षिततेसाठी संभाजी राजांना काही काळ मथुरेत ठेवण्यात आलं होतं.

शिवरायांचे स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी संभाजीराजे महाराजांच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनी छत्रपतींच्या गादीवर विराजमान झाले. रायगडावरच संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. १६ जानेवारी १६८१ रोजी महाराष्ट्रातील रायगड किल्ल्यावर छत्रपती संभाजींचा भव्य राज्याभिषेक झाला. अशा या शूर राजाचे ११ मार्च १६८९ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'असे' टाळा व्हॉट्सअ‍ॅप स्कॅम; आपले खाते ठेवा सुरक्षित!

व्हॉट्सपवर दररोज कोट्यवधी युजर्स अ‍ॅक्टिव्ह असतात, त्यामुळे घोटाळेबाजांनी व्हॉट्सअ‍ॅपवर लोकांची फसवणूक सुरू केली आहे. व्हॉट्सअ‍ॅप वापरतांना तुमची एक छोटीशी चूक तुमचे बँक खाते रिकामे करू शकते, पण तुम्ही स्वतःला फसवणूक करणाऱ्यांच्या जाळ्यात अडकण्यापासून वाचवू शकता.



जगातील सर्वाधिक वापरले जाणारे इन्स्टंट मेसेजिंग अ‍ॅप व्हॉट्सअ‍ॅपवर दररोज लाखो युजर्स अ‍ॅक्टिव्ह असतात. यामुळेच फसवणूक करणाऱ्या किंवा घोटाळे करणाऱ्यांनी व्हॉट्सप हे लोकांची फसवणूक करण्याचे नवीन ठिकाण बनवले आहे. व्हॉट्सअ‍ॅपमध्ये त्याच्या युजर्ससाठी अनेक सेफ्टी आणि प्रायव्हसी फीचर्स आहेत, ज्याचा वापर करून तुम्ही स्वतःला सेफ ठेवू शकता.

**व्हॉट्सअ‍ॅपवर 'या' चुका करणे टाळा**

**बनावट संदेश :** घोटाळेबाज फसवण्यासाठी व्हॉट्सप युजर्सना बनावट संदेश पाठवतात. लोकांना प्रलोभन देण्यासाठी, त्यांना बक्षिसाची रक्कम किंवा कोणतीही किंमत जिंकण्याचे आमिष दाखवले जाते आणि युजर्सच्या जाळ्यात पडताच फसवणूक करणाऱ्यांचा खरा खेळ सुरू होतो.

**नोकरीच्या संधी :** दुसरी चूक जी व्हॉट्सअ‍ॅप युजर्स अनेकदा करतात. घोटाळेबाज लोकांना व्हॉट्सपवर उच्च पगाराच्या नोकऱ्या देणारे मेसेज पाठवतात. एखादी कंपनी अधिक पैसे देऊ करत असल्याचे लोकांना दिसताच ते अर्ज करण्यासाठी अज्ञात लिंकवर क्लिक करतात. मग काय होणार, अनोळखी लिंकवर क्लिक करताच फोन हॅक होतो आणि मग खाते रिकामे होते.

**पोलीस असल्याचा बनाव :** घोटाळेबाजांनी आता पोलिस असल्याचे भासवून लोकांना फसवण्याच्या नवनव्या युक्त्या वापरायला सुरुवात केली आहे. आधी व्हॉट्सपवर एका अनोळखी नंबरवरून कॉल येतो आणि नंतर तुमच्या नावावर कुरिअर आले असून त्यात ड्रग्ज सापडले आहेत, तुम्हाला वाचवायचे असेल तर पैसे ट्रान्सफर करा, असे सांगितले जाते. भीतीपोटी एखादी व्यक्ती चुकीची पावले उचलते आणि जेव्हा समजते तोपर्यंत तुमचे खाते रिकामे झालेले असते. याशिवाय लोकांना काही कॉल्सदेखील येतात ज्यात स्कॅमर तुमच्या ओळखीच्या एखाद्याची तोतयागिरी करतात आणि ते आपत्कालीन स्थितीत अडकले आहेत असे सांगून फसवणूक करतात.

# ज्येष्ठ समाजसेविका डॉ. इंदूताई पटवर्धन

समाजाने दूर अंधःकारात लोटलेल्या कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका, राजकुमारी डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म जमखिंडीच्या राजघराण्यात १४ मे १९२६ रोजी झाला.

इंदुताईंचे शिक्षण जमखिंडी व कोल्हापूर येथे झाले. राजकुमारी म्हणून जन्मलेल्या इंदूताईंनी १६व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. मॉंटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या सेंट कोलंबो स्कूलमध्ये शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन ॲम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. दुसऱ्या महायुद्धातल्या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जखमी लष्करी जवानांचे शुश्रुषेसाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. वर्ष १९५३ मध्ये सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. पूना विमेन्स काउंसिलचे कामही त्या करीत होत्या. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनच्या त्या संस्थापक सदस्या होत्या. लष्करातील जवान व आदिवासी समाजातील आजारी, जखमी रुग्णांची सेवा करत त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.



**निमित्त**

मुंबई इलाख्यात आपले जमखंडी संस्थान विलीन करणारे त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले संस्थानिक होते. पुणे येथील पूना कॉलेजला सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपये इतकी देणगी त्यांनी दिली होती व तेव्हापासून ते कॉलेज सर परशुरामभाऊ कॉलेज (एस. पी. कॉलेज) म्हणून ओळखले जाऊ लागले.

ऑक्सफॉम या संस्थेकडून १९६१ साली मिळालेल्या १७ हजार रुपयांच्या मदतीवर पुण्याजवळच्या डुडळगाव येथील एका ओसाड जागेवर आनंदग्राम' नावाने कुष्ठरोग्यांची वसाहत उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळ कुष्ठरोग सेवाकेंद्र सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. वर्ष १९६५मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अमलात आल्यावर त्यांनी ८० रुग्णांसह कुष्ठरोग्यांसाठी प्रत्यक्षात वर्ष १९६५मध्ये काम सुरू केले. आळंदी जवळच्या सध्याच्या आनंदग्राम' येथे वर्ष १९७० मध्ये त्यांनी स्थलांतर केले.

उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी अशा व्यक्तींच्या सहाय्यामुळे आनंदग्राम'ला सध्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. सध्या आश्रमात राहणाऱ्यांकडून येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. रेशमासाठी तुती इत्यादीची लागवड केली जाते. मुला-मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे आदर्शवत ठिकाण झाले आहे. खाद्यतेल सोडले तर सर्व काही इथेच बनते, धान्य पिकते, हातमागावर कपडे तयार होतात, दवाखाना, केशकर्तनालय इथे आहे. गोबर गॅस बनतो. इतके स्वयंपूर्ण गाव येथे त्यांनी उभे केले.

इंदुताई पटवर्धन यांच्या कार्याची दाखल घेऊन शासनाने त्यांना दलितमित्र हा पुरस्कार दिला. ८ फेब्रुवारी १९९९ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार शहरात ठिकठिकाणी सोसाट्याचा वारा आणि तुरळक प्रमाणात पाऊस पडला. या वेळी दुपारच्या सुमारास अंधारून येत काळे ढग दाटून आले होते.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# कांदा, लसणाचे सेवन केल्यास होणार 'हे' परिणाम

तुमच्यापैकी बरेच लोक कांदा, लसूण खातात. कांदा-लसूण प्रत्येकाच्या आहारात महत्त्वाचा घटक असतो. दररोज या पदार्थांचे सेवन केले जाते. अनेकांना तर त्याच्याशिवाय खाण्याचा आनंद घेता नाही, पण तुम्हाला माहीत आहे का, अनेक जण कांदा-लसूण खाणे टाळतात. शाकाहारातल्या जैन आणि वैष्णव प्रकारच्या जेवणात कांदा आणि लसूण खात नाहीत.



जर कांदा व लसूण खाल्ले नाहीत, तर तुमच्या शरीरावर काय परिणाम होऊ शकतो, या विषयावर आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.

आहारतज्ज्ञ सांगतात, कांदे आणि लसणामध्ये सल्फरयुक्त रासायनिक संयुगे असतात; ज्यांना फ्रक्टन्स व डिसल्फाइड म्हणतात. ही संयुगे अन्ननलिकेच्या अस्तरासाठी त्रासदायक ठरू शकतात. विशेषत: ज्यांना छातीत जळजळ किंवा ॲसिड रिफ्लक्स होण्याची शक्यता असते. या दोन्ही गोष्टींना आहारातून काढून टाकल्याने काहींच्या छातीत जळजळ होऊ शकते. तर दुसरीकडे काही लोक कांदे आणि लसूण यांच्याबद्दल अतिसंवेदनशील असू शकतात; ज्यामुळे ते खाल्ल्यानंतर त्यांना मळमळ, अतिसार किंवा पोटात पेटके यांसारखे अस्वस्थता निर्माण करणारे त्रास होतात. त्यांना हे पदार्थ वर्ज्य केल्याने या परिस्थितीत आराम मिळू शकतो. तुमच्या आहारामध्ये कांदे आणि लसूण समाविष्ट आहेत. हे कार्बोहायड्रेट्स आहेत, जसे की साखर आणि फायबर; जे काही लोकांसाठी लहान आतड्यांद्वारे शोषले जात नाहीत. त्यांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने तुम्हाला संवेदनशील ऋख ट्रॅक्ट किंवा इरिटेबल बोवेल सिंड्रोम आणि ॲसिड रिफ्लक्स यांसारख्या परिस्थितींना सामोरे जावे लागू शकते; ज्यामुळे गॅस, गोळा येणे, अतिसार व बद्धकोष्ठता होऊ शकते.

लसूण आणि कांदा तामसिक जेवणाच्या श्रेणीत आहे. हे पदार्थ गरम मानले जातात. असे म्हटले जाते की, हे पदार्थ खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन कमी-जास्त होते. अशा स्थितीत राग, एक्साइटमेंट्, आळस जास्त येतो. म्हणून पावसाळ्यात हे पदार्थ न खाण्याचा सल्ला दिला जातो.

हे लक्षात ठेवावे की, कांदे आणि लसणामध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि लिसिनचे प्रमाण जास्त असते. हे एक अँटिऑक्सिडंट आहे; ज्यामध्ये रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल कमी होणे यांसारखे संभाव्य आरोग्य फायदे आहेत. त्यामुळे ते तुमच्या आहारातून वर्ज्य केल्याने फायदेशीर संयुगे कमीही होऊ शकतात.

# खालापुरात व्यवसायातील रागातून खून

## २४ तासांत आरोपी ताब्यात; १६ मेपर्यंत पोलीस कोठडी

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

शेजारी शेजारी असलेल्या हॉटेल व्यवसायातून भानूदास भिवा चौधरी (वय ५४, रा. कलोते, ता. खालापूर) यांचा खून झाल्याची घटना कलोते येथे घडली. खालापूर पोलिसांनी वेगाने तपास करीत २४ तासांत नितेश पाटील आणि त्याचा सहकारी मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली (मूळ रा. उत्तरप्रदेश, सध्या रा. कलोते) यांना अटक केली आहे. आरोपींना न्यायालयाने गुरुवार (दि.१६)पर्यंत पोलीस कस्टडी सुनावली आहे.

याबाबत खालापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भानुदास यांचा वडापाव, चहा विक्रीचा कलोते फाटा येथे हॉटेल व्यवसाय होता. १० मे रोजी त्यांची पत्नी व मुलगा रात्री ९ वा. हॉटेल बंद करून घरी जाण्यास निघाले होते. भानुदास यांनी पत्नी व मुलास घरी जाण्यास सांगून स्वतः हॉटेलमध्येच रात्रभर झोपले. दुसऱ्या दिवशी सकाळी भानुदास यांची पत्नी व मुलगा हॉटेल उघडण्यास आले असता, भानुदास हॉटेलमध्ये दिसले नाही. म्हणून त्यांनी त्यांचा शोध घेतला असता, हॉटेलच्या मागे साधारण १०० मीटर अंतरावर उंबराच्या झाडाजवळ भानुदास मृतावस्थेत आढळले. त्यांच्या मृतदेहावर जखमा झाल्याने त्यांच्या मृत्यूबाबत संशय निर्माण झाल्याने भानुदास यांच्या मुलाने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जे. जे. रुग्णालय येथे रवाना करण्यात आले. शवविच्छेदन अहवालात गळा दाबल्याने मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर विविध पथके स्थापन करून गोपनिय माहिती प्राप्त करून संशयितांकडे सखोल तपास सुरू करण्यात आला. मिळालेली माहिती व तांत्रिक पुराव्यांच्या आधारावर नितेश पाटील व मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता, नितेश पाटील याने मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली याच्या सहकार्याने भानुदासचा गळा दाबून ठार केल्याचे कबुल केले. भानुदासमुळे आपल्या हॉटेलमध्ये गिऱ्हाईक येत नसल्यामुळे आपल्या व्यवसायावर परिणाम होतो, असा नितेशचा समज होता.



कोणताही पुरावा नसताना खालापूर पोलिसांनी ही कामगिरी पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक खालापूर मिलिंद खोपडे, सपोनि मनिष मोरे, युवराज सुर्यवंशी, पोउनि प्रदिप आरोटे, मपोउनि सरीता मनवर, रोहिदास भोर, शिवाजी जुंदरे, सहा. फौजदार सुभाष म्हात्रे, हवालदार हरतन बागुल, नितीन शेडगे, निलेश कांबळे, अमित सावंत, विशाल शिंदे, हेमंत कोकाटे, शरद फरांदे, रणजीत खराडे, मनोज सिरतार, चंद्रकांत पयेर, आशिष पाटील, महिला पोलीस हवालदार हेमा कराळे, अंकिता चिंबुळकर, प्रतीक्षा म्हात्रे, दिक्षा पवार यांनी खुनाचा उलगडा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

# आवडेल तेथे प्रवास योजनेला प्रवाशांचा प्रतिसाद

## एसटीच्या तिजोरीत नऊ लाखांची भर; ६९३ पासेसची विक्री

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील छोटे व्यापारी, उद्योजक, छोटे विक्रेते अशा अनेकांना कामानिमित्त सलग काही दिवस एसटीचा प्रवास करावा लागतो. अनेक हौशी पर्यटक आठवड्याची सुट्टी घेऊन मनसोक्त भ्रमंती करतात. अशा प्रवाशांसाठी असलेल्या आवडेल तेथे प्रवास या योजनेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद लाभला आहे. रायगड विभागात १ एप्रिल २०२३पासून ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षात ६८३ प्रवाशांनी प्रवास केला आहे.

एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवाशांच्या हितासाठी विविध प्रवास योजना आणि उपक्रम राबवण्यात येतात. यापैकीच एक असणाऱ्या आवडेल तिथे कोठेही प्रवास या योजनेला प्रवाशांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून १ एप्रिल २०२३पासून ३१ मार्च २०२४पर्यंत ६८३ प्रवाशांनी प्रवास करीत अलिबाग आगाराच्या तिजोरीत नऊ लाख १९ हजार ३१५ रुपयांचे उत्पन्न जमा झाले असल्याची माहिती रायगड विभाग नियंत्रक घोडे यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, पेण, मुरूड, रोहा, श्रीवर्धन, माणगाव, महाड, कर्जत असे आगार आहेत. या योजनेत सर्वाधिक २३२ पास हे अलिबाग आगारातून गेले असून त्याच्या विक्रीतून तीन लाख १९ हजार २७५ रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे, तर मुरूड आगारात सर्वांत कमी म्हणजे केवळ चार पासची विक्री होत. त्यातून चार हजार ६०० रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. आवडेल तिथे कोठेही प्रवास ही योजना १९८८पासून सुरू करण्यात आली आहे. प्रवाशांशी जिव्हाळ्याचे आणि मैत्रीचे नाते निर्माण व्हावे, तसेच पर्यटनस्थळे, धार्मिक स्थळे अशा विविध ठिकाणी कमी खर्चात प्रवाशांना हव्या त्या ठिकाणी प्रवास करता यावा, या उद्देशाने आवडेल तिथे कोठेही प्रवास ही योजना सुरू करण्यात आली.

या योजनेंतर्गत १० दिवसांचा पास दिला जात होता, मात्र २३ एप्रिल २००६पासून १० दिवसांच्या पासप्रमाणे ४ दिवसांचा पास दिला जात आहे, तर २ मे २०१०पासून १० दिवसांचा पास बंद करून त्याऐवजी सात दिवसांचा पास देण्यात येत असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले.

# नेरळ आनंदवाडी केंद्र ठरले दिव्यांग कर्मचारी केंद्र



**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात हरित मतदान केंद्र, महिला कर्मचारी असलेले गुलाबी मतदान केंद्र आणि दिव्यांग कर्मचारी असलेले मतदान केंद्र बनविण्यात आली होती. त्यामध्ये नेरळ येथील आनंदवाडी केंद्र हे दिव्यांग कर्मचारी केंद्र होते. या केंद्रावर विधानसभा मतदारसंघातील सर्वाधिक दिव्यांग मतदार असल्याने असा प्रयोग या मतदान केंद्रावर करण्यात आला होता.

कर्जत विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.१३) मावळ लोकसभासाठी मतदान घेण्यात आले. त्यासाठी दिव्यांग मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वाधिक दिव्यांग मतदार आनंदवाडी केंद्रामध्ये असल्याने येथे दिव्यांग कर्मचारी यांची नियुक्ती निवडणूक विभागाने केली होती.

नेरळ ग्रामपंचायतीमधील ८१ नंबरचे मतदान केंद्र असलेल्या आनंदवाडी केंद्रावरील सर्व निवडणूक कर्मचारी हे दिव्यांग होते. त्या विभागाचे झोनल अधिकारी म्हणून कर्जत भात संशोधन केंद्रातील अधिकारी डॉ. रवींद्र मर्दाने तर त्यांच्या मदतीला मतदान केंद्रप्रमुख म्हणून कैलाश घाडके तर सहाय्यक म्हणून नितीन मच्छिंद्र भानवसे, रमेश विठ्ठल संतपाल, जनार्दन नारायण तांबे आणि शिपाई म्हणून प्रभाकर पंढरीनाथ कर्णुक तर बीएलओ म्हणून काम करणारे कर्मचारीदेखील अपंग होते आणि त्यांनी निवडणूक कामी मदत केली.

दुपारी मतदान प्रक्रिया सुरू असताना मावळ लोकसभेच्या कर्जत विधानसभा मतदारसंघ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी भेट देऊन पाहणी केली.

# खालापुरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची हजेरी; गारांचाही वर्षाव

**खोपोली : प्रतिनिधी**

अंगाची लाहीलाही करणाऱ्या उन्हाळ्याला वैतागलेल्या खालापूर तालुक्यात सोमवारी (दि.१३) अवकाळी पावसाने गारवा निर्माण केला, परंतु दुसरीकडे अवकाळीचा फटका मतदान टक्केवारीला बसला आहे.

सातत्याने चाळीशी पार करणारे तापमानामुळे नागरिक वैतागले होते. हवामान खात्याने दिलेला पावसाचा अंदाज खरा ठरवत सोमवारी दुपारी ४ वा. च्या सुमारास जोरदार वाऱ्यासह पावसाने तालुक्यात अनेक भागात हजेरी लावली. रसायनी, चौक, खोपोली, खालापूर, देवन्हावे, वावोशी, केळवली भागात जोरदार पाऊस बरसला. खालापूर तसेच केळवली भागात गडगडाटासह गारांचा पाऊस पडला.



ऊन कमी झाल्यानंतर मतदानाला बाहेर पडू या प्रतीक्षेत असलेल्या मतदारांना पावसामुळे घरीच बसावे लागले. मतदार मोठ्या संख्येने बाहेर पडण्याच्या वेळेतच पावसाने हजेरी लावल्यामुळे मतदानावर परिणाम खालापुरात जाणवणार आहे. मुसळधार पडलेला पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांना मोठा फटका बसला आहे. कच्ची वीट मोठ्या प्रमाणात भिजून पुन्हा माती झाल्याने नुकसान सहन करावे लागणार आहे, तर शेतकऱ्याने बेगमी म्हणून साठवून ठेवलेला पेंढा भाजल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे.

# अलिबाग चेंढरे येथे घरफोडी; सहा लाखांचा ऐवज लंपास

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागनजीक चेंढरे येथील घरात प्रवेश करून अज्ञात चोरट्याने सहा लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शहरातील चेंढरे येथे फिर्यादी प्रशांत जकाते यांच्या किचनच्या लोखंडी ग्रीलच्या पट्ट्या हत्याराने वाकवून त्याद्वारे प्रवेश घरातील बेडरूममधील तीन कपाटातून व देवघरातील कपाटातून सोन्याचे एक मंगळसूत्र, सोन्याची एक चप्पल कंठी, सोन्याचा एक लक्ष्मी हार, सोन्याचा दोन पाटल्या, सोन्याचे तीन गोफ, सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे कानातले तीन जोड, सोन्याचा एक नेकलेस, चांदीचे एक ताट, एक अष्टदळ, एक लोटी, दोन पेले, एक पानदान, दोन अत्तरदाणी, दोन छोट्या समई, एक मोठी समई, पाच वाट्या, आच्यमन पळी, एक छोटी तबकडी, एक अगरबत्तीचे घर, एक छोटा चमचा असा एकूण सहा लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरट्याने लंपास केला. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अधिक तपास अलिबाग पोलीस करीत आहेत.

# तंत्रशास्त्र विद्यापीठात अभियंता वसंत महोत्सव

**माणगाव** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात अभियंता वसंत २०२४ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस चाललेल्या महोत्सवात विद्यार्थ्यांनी कलागुणांना वाव देत रांगोळी, निबंध स्पर्धा, नाटक, स्टोरी टेलिंग, इन्स्ट्रुमेंट प्लेईंग, डेबिट, वक्तृत्व स्पर्धा, फॅशन शो सादर केले.

८ ते १० मे या कालावधीमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, तसेच कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# रामवरदायिनी देवीच्या वार्षिक यात्रोत्सवाची सांगता

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पार पार्वतीपूर येथील ऐतिहासिक श्री क्षेत्र पार्वतीपूर पार येथे श्री आई रामवरदायिनी देवीचा वार्षिक यात्रोत्सव ५ ते १३ मेपर्यंत आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने पार गावातील सर्व ग्रामस्थ तसेच चाकरमानी यात्रोत्सवात सहभागी झाले. याखेरिज, श्रीरामवरदायिनी मातेचे दर्शन घेण्यासाठी रायगड, रत्नागिरी व सातारा जिल्ह्यातील भाविकांची गर्दी झाल्याचेही दरवर्षीप्रमाणे दिसून आले.

यात्रोत्सवाच्या प्रारंभी विविध धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी आई श्रीरामवरदायिनी मातेस तसेच देवदेवतांना घाटमाथा येथे अभिषेक आणि दुपारी सत्यनारायण महापूजा, सायंकाळी पालखी मिरवणूक आणि रात्री सासन काठी उभारणीचा कार्यक्रम झाला. मेरोजी कुमठे गावची ग्रामदेवता श्री झोळाई माता आणि शिरवली गावचे ग्रामदैवत श्री जननी कुंभळजाई यांचे आगमन झाल्यानंतर रात्री ४३ गावातील देवांचे विडे काढण्याचा कार्यक्रम झाला. मेरोजी श्रींची महापुजा, रात्री विविध गावातील देवदेवतांचे आगमन तसेच बगाडाचा कार्यक्रम करण्यात आला. यानंतर मनोरंजनपर लोकनाट्य तमाशा सादर करण्यात आला.

महाआरती व मंदिर प्रदक्षिणा तसेच रोज रात्री ढोल-लेझीमच्या तालावर आरती व मंदिर प्रदक्षिणा करण्यात आली. महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला असता महिलांची अलोट गर्दी झाली. शनिवारी देवस्थान ट्रस्टच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. रविवारी होमहवन आणि इतर विधी झाल्यानंतर रात्री शालेय सांस्कृतिक कार्यक्रम, मान्यवरांचे स्वागत आणि बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आले. यानंतर श्री वरदायिनी माता तरुण नाट्य मंडळ चिंचणी यांचे ५९वे नाट्य तुफान विनोदी नाटक सादर करण्यात आले.

सोमवारी मेरोजी वार्षिक यात्रोत्सवाच्या सांगतेवेळी छबिना आणि गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी लळीत, लघुरुद्राभिषेक, होम समाप्ती आणि महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाने यात्रेची सांगता झाली.



# कर्जतमध्ये नागरिकांनी बजावला मतदानाचा हक्क

**कर्जत : प्रतिनिधी**



मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.१३) मतदान घेण्यात आले. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी मतदारांचा उत्साह चांगला होता. ग्रामीण भागात असलेल्या ढगाळ वातावरण यामुळे दुपारीदेखील मतदान उत्साहात सुरू होते. शेवटच्या तासात प्रत्येक मतदान केंद्रावर प्रचंड गर्दी मतदारांनी केल्याचे चित्र होते. कर्जत विधानसभा मतदारसंघात तीन मतदान केंद्रावरील मतदान यंत्र यात किरकोळ बिघाड झाला. त्यात माजी आमदार सुरेश लाड यांना ताटकळत थांबून रहावे लागले.

१८९ कर्जत विधानसभा मतदारसंघातील ३३९ मतदान केंद्रावर सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. सकाळच्या वेळी बहुसंख्य मतदान केंद्रावर गर्दी होती आणि दुपारच्या उन्हाचा त्रास होत असतानादेखील माणगाव, शेलू, बेडीसगाव, वरणे, साळोख, कळंब, कशेळे, कडाव, खांडपे, दहिवली या ठिकाणी भर उन्हात मतदारांचा मतदान करण्यासाठी उत्साह कायम होता. दुपारी दहिवली येथील मतदान केंद्रावर आधीच १४२५ मतदार आहेत आणि तेथील मशीनचे वायरिंग जोडणीही व्यवस्थित काम करीत नसल्याने मतदारांना तब्बल दोन तास थांबून राहावे लागत होते. त्यामुळे तत्काळ तालुक्याचे तहसीलदार डॉ. शीतल रसाळ हे दाहीवली केंद्रावर पोहचले. मतदान यंत्रामधील वायरिंगचे दोष निवारण करण्यात पाऊण तासाचा कालावधी लागल्याचे स्पष्ट केले.

तिवरे येथील मतदान केंद्रांवरील मतदान यंत्र मशीनमध्येदेखील बिघाड निर्माण झाला आणि तो बिघाड अर्ध्या तासात दूर केल्यावर कर्जतमध्ये मतदान सुरळीत पार पडले. उन्हाचा तडाखा यामुळे दुपारच्या वेळी देखील मतदारांना मतदान करता यावे यासाठी कर्जत विधानसभा मतदारसंघातील बहुसंख्य मतदान केंद्रावर कापडी मंडप उभारण्यात आले होते, परंतु दुपारी वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने सर्व ठिकाणी कापडी मंडप यांचे मोठे नुकसान केले.

दहिवली भागातील जयराम गांगल यांनी वयाच्या १०१ वर्षी लोकसभा निवडणुकीसाठी गृहमतदान केले, तर पोही येथील हौसाबाई भोईर यांनी वयाच्या ९८ वर्षी मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले.

### ▪ मतदान केंद्रावर व्हिलचेअर

*कर्जत विधानसभा मतदारसंघात १०१६ अपंग मतदार आहेत, तसेच ५६८० एवढे मतदार हे ८५ वर्षे वयावरील आहेत. त्यामुळे त्यांना मतदारांचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्र हद्दीत १०० मीटर आत वाहने यांना बंदी घातल्याने व्हिलचेअरवर बसवून मतदारांना मतदान केंद्रात नेले जात होते, तर मतदारांना आरोग्य समस्या निर्माण झाल्यास आरोग्य विभागाकडून आशासेविका प्रत्येक बुथवर तैनात होत्या.*

# नर्सिंग कोर्स प्रवेशाकरिता अर्ज सादर करावेत

**रायगड** : आर्मी कॉलेज ऑफ नर्सिंग जालंधर कँट यांच्या ३ मे २०२४ पत्रानुसार बीएससी नर्सिंग कोर्स ॲडमिशनकरीता ऑनलाईन ॲडमिशन टेस्ट आर्मी कॉलेज ऑफ नर्सिंग जालंधर कँट आणि आर्मी संस्था ऑफ नर्सिंग गुवाहाटी येथे ३० जून रोजी घेण्यात येणार असून रायगड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी नर्सिंग कोर्स ॲडमिशनकरीता अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.




**खोपोली : मावळ मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी मोगलवाडी येथील बूथ नं. २९५, २९६ केंद्राला भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांच्यासमवेत भाजपचे कर्जत-खालापूर समन्वयक हेमंत नांदे, वैद्यकीय सेलचे विकास खुरपुडे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

# अनधिकृत शाळांबाबत जनजागृतीची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीतील अनधिकृत शाळांची यादी महापालिकेने नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या अनधिकृत शाळांमध्ये आपल्या पाल्याला दाखल करू नये, असे आवाहन पालिकेमार्फत करण्यात आले आहे. याबाबत पालिकेकडून काही वर्तमानपत्रांत जाहिरातबाजी करण्यात येत असली तरी नागरिकांना स्वच्छतेविषयक बाबींमध्ये जनजागृती करणारी पालिका अनधिकृत शाळांबाबत शहरभर तसेच अनधिकृत शाळांच्या परिसरात फलकबाजी करणे आवश्यक आहे.



नवी मुंबईतील पाच अनधिकृत असलेल्या शाळांच्या नावासकट यादी प्रसिद्ध केली आहे. या सर्व शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. यंदाच्या २०२४ सालात अनधिकृत शाळांची संख्या कमी झालेली आहे. जाहीर केलेल्या पाच शाळांपैकी सर्व शाळा या इंग्रजी माध्यमाच्या आहेत. अनेक शाळांची प्रवेश प्रक्रिया ही डिसेंबरपासून किंवा जानेवारी व फेब्रुवारीपासून सुरू होते. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांचे प्रवेश या शाळांमध्ये घेऊन झालेले असतात. अनधिकृत असूनही हे संस्थाचालक दर्जेदार शिक्षणाचे आमिष दाखवून शाळा प्रवेश सुरू असल्याचे फलक लावून विद्यार्थ्यांचे प्रवेश करून घेतात. मुलांच्या पाल्यांकडून अव्वाच्या सव्वा फी वसूल करतात. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी चांगले व दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून पालक कर्ज काढून शाळेच्या फी भरतात. प्रवेश घेतलेल्या पालकांना या शाळेच्या अनधिकृततेबाबत काहीही माहीत नसते. त्यांनंतर पालिका अनधिकृत शाळांची यादी जाहीर करते. त्यामुळे पालक प्रवेश घेऊन फसले जातात. शाळा व्यवस्थापनाकडे विचारणा केल्यास शाळेला मान्यता मिळावी यासाठी प्रक्रिया सुरू असल्याचे उत्तर पालकांना देण्यात येते. त्यावर पालक विश्वास ठेवत असल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच चालू ठेवतात.

अनेकदा घराच्या जवळ शाळा असल्याने अनेक पालकांचा कल या शाळांकडे वाढतो. या सर्व बाबींची कल्पना पालिकेला असते, मात्र तरीही शहरात अनधिकृत शाळा चालवल्या जात असताना त्यांची यादी वर्षाच्या सुरुवातीलाच प्रसिद्ध होणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या विविध योजना असोत वा स्वच्छ भारत सर्वेक्षण पालिका शहरातील गल्लोगल्लीत बॅनरबाजी करत जनजागृती करते. त्यासाठी लाखो रुपये खर्च करत असताना पालिकेकडून अनधिकृत शाळांच्या यादीबाबत जानेवारी, फेब्रुवारीमध्येच अशी बॅनरबाजी का केली जात नाही? असा प्रश्न यानिमित्याने उपस्थित होत आहे.

**नवी मुंबईतील अनधिकृत शाळांची यादी**

- इस्माइल एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई
- ग्लोबल एज्युकेशन ट्रस्ट, अग्रीपाडा, मुंबई
- आटपती एज्युकेशन ट्रस्ट, नेरूळ, सिवूड.
- इलिम फुल गोस्पेल ट्रस्ट, ऐरोली
- मारानाथ संस्था





**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदान प्रक्रिया झाली. यादरम्यान माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ठिकठिकाणी मतदान केंद्रांना भेटी दिल्या. त्यांनी मतदारांसह उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले.**

# ‘अवकाळी’ने नवी मुंबईत नुकसान; अनेक ठिकाणी झाडे कोसळली, शॉर्टसर्किटच्याही घटना

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात सोमवार रोजी दुपारपासून वादळी वाऱ्याना सुरुवात झाली. संपूर्ण नवी मुंबईत ढगाळ वातावरण तयार झाले होते. तर ताशी ५० ते ६० की.मीने वारे वाहत होते. त्यामुळे संपूर्ण नवी मुंबईला धुळीने वेढले होते. त्यामुळे नवी मुंबईत धूळधाण उडल्याची पाहण्यास मिळाली. तर अचानक आलेल्या



पावसाने नागरिकांचीदेखील त्रेधा उडाली.

नवी मुंबईत अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने व जोरदार वाऱ्याने नुकसान झाले. अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडाले. तर झाडे कोसळून फांद्या देखील तुटून पडल्या. काही वाहनांवर झाडे कोसळल्याने वाहनांचे नुकसान झाले. ऐरोली येथे महावितरणच्या हाय टेन्शन टॉवरमध्ये शॉर्ट सर्किट झाले. त्यामुळे नागरिकांची अधिक घबराट उडाली. काही ठिकाणे वीज देखील गेल्याने महावितरणला अनेक तक्रारी प्राप्त झाल्या. पाऊस पडल्याने काही ठिकाणी अंदाज न आल्याने मोटार सायकलस्वार घसरले. नवी मुंबई पालिकेने देखील तातडीने खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले.

**उन्हाच्या काहिलीतून काहीसा दिलासा**

सध्या तापमान ४० ते ४२ डिग्री झालेले आहे. उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. असे असताना सोमवारी झालेल्या पावसाने काहीसा दिलासा नवी मुंबईकरांना मिळाला. उष्णता कमी झाल्याने नागरिकांनी टेरेस, परिसरात फिरून काहीशा थंड वातावरणाचा आनंद लुटला.

**पोलिसांनी दिला ट्रॅफिक अलर्ट**

ठाणे–बेलापूर रोड वरील बेलापूर वाहिनीवर सविता केमिकल जवळ वादळामुळे इलेक्ट्रिक पोल रस्त्यावर पडला. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक पोलिसांनी तातडीने पनवेल व बेलापूर जाणारे जाणाऱ्या जड व अवजड वाहन चालकांनी वाहने पावणे सिग्नल वरून डाव्या बाजूने व्हाईट हाऊस–शालिमार चौक–महापे एमआयडीसी मार्गाचा वापर करण्याच्या सूचना देत पर्यायी मार्ग सुचवत प्रवाशांना दिलासा दिला. तर हलक्या वाहनांसाठी ठाणे बेलापूर मार्गावरील हलक्या वाहनांनी पावणे गाव ब्रिज वरून बेलापूरला जाण्याकरिता मार्गाचा वापर करावा, असे आवाहन केले होते.

# नरेश म्हस्केंसाठी सीवूड्समध्ये रंगली मिसळ पे चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार**

महायुतीचे ठाणे लोकसभेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारार्थ सिवूड (पश्चिम) येथे ’मिसळ पे चर्चा’ या कार्यक्रमाचे आयोजन भाजप युवा मोर्चा नवी मुंबईचे माजी जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे यांच्या वतीने करण्यात आले होते.



या वेळी सिवूड मधील नागरिक तसेच महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहुन मिसळचा आस्वाद घेतला. या वेळी महायुतीचे उमेदवार यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करण्याचा संकल्प करण्यात आला.

भाजप बेलापूर विधानसभा निवडनुक प्रमुख निलेश म्हात्रे, शिवसेना उपनेते विजय नाहटा, भाजप जिल्हा उपाध्यक्ष विजय घाटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष नामदेव भगत, आरपीआयचे महेश खरे शिवसेना शहरप्रमुख विजय माने, उपशहरप्रमुख दिलीप घोडेकर, संतोष दळवी, भाजप महिला मोर्चा प्र क्रं १११च्या माजी वॉर्ड अध्यक्ष अश्विनी घंगाळे यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी नेत्यांनी भाषणे करत, महायुतीच्या उमेदवाराला का निवडून द्यायचे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच राजन विचारे यांनी १० वर्षांत कोणते प्रकल्प नवी मुंबईसाठी आणले, किती पूर्ण करून दाखवले यावर टीकादेखील केली.

# बेलापूर न्यायालयाच्या शौचालयाची दुरवस्था

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बेलापूर न्यायालयातील शौचालयाची अवस्था दयनीय झाली आहे. त्यामुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांसह नागरिकांची गैरसोय होत आहे. वकीलवर्गाकडूनही नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

बेलापूर सेक्टर १५ येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या इमारतीमध्ये दररोज सुमारे पाचशेहून अधिक प्रमाणात नागरिकांची ये–जा असते. ज्यामध्ये न्यायालयातील कर्मचारी वर्ग, न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी आदींचा समावेश आहे, मात्र न्यायालय इमारतीमधील स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झाल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. स्वच्छतागृहाची दुर्गंधी अगदी बाहेर येत असल्याने नाकावर रुमाल ठेवून परिसरात वावरावे लागत आहे. याठिकाणी येणाऱ्या दुर्गंधीमुळे आजारी पडण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. स्वच्छतागृहाची अवस्था पाहता कित्येक महिने स्वच्छता न केल्याचे दिसून येत आहे. नागरिकांना नाईलाजास्तव स्वच्छतागृहाचा वापर करावा लागतोय. येथील भांडी तुटलेली असून पाणी नसल्याने रोष व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे किमान स्वच्छतागृहाची साफसफाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**न्यायालय प्रशासनाकडून नगरिकांच्या मागणीची दखल घेऊन स्वच्छतागृहाची स्वच्छता करावी, जेणेकरून नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होणार नाही.**
**–मनोज शिंदे, नागरिक**

**न्यायालयात नागरिकांची ये–जा सुरू असते. त्यात काही आरोपी अतिशय गलिच्छ असतात. तसेच स्वच्छतागृहातील दुर्गंधी बाहेरपर्यंत येते. इतकी अस्वच्छता असल्याने रोगराईदेखील पसरू शकते.**
**–ॲड. सुशांत जोशी**



**पनवेल : मावळ लोकसभा निवडणुकीसाठी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, हरिश्चंद्र म्हात्रे, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप अध्यक्ष तुषार भोईर, चंद्रकांत पाटील, स्मिता भोईर, चंद्रकांत जनार्दन पाटील, रंजना पाटील, मिनाक्षी पाटील, कमलाबाई म्हात्रे, सुशीला पाटील, आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे आदींनी मतदानाचा हक्क बचावला.**



**पनवेल : करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांनी मतदानाचा हक्क बजावला.**



**कळंबोली : भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे व कळंबोली शहर चिटणीस बायजा बारगजे यांनी मतदान केले.**

# ऐरोलीत २२ जणांनी केले गृहमतदान

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा क्षेत्रामध्ये रविवारी (दि. १२) गृहमतदान प्रक्रिया राबविण्यात आली. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना घरातूनच मतदान करता आल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

८५ वर्षांवरील दिव्यांग नागरिक व ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाच्या घरी जाऊन मतदानाची संधी देण्यात आली आहे. मतदान गुप्त राहील याचीही काळजी घेतली. पहाटेपासून निवडणूक कर्मचाऱ्यांनी मतदारांच्या घरी जाऊन त्यांची मतपत्रिका सीलबंद बॉक्समध्ये घेण्यात आली. २२ मतदारांची नोंदणी झाली होती. त्यापैकी २० जणांनी मतदान केले.



**पनवेल : माजी नगरसेवक मुकिद काझी, भाजप अल्पसंख्याक मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मावळ लोकसभा मतदारसंघ संयोजक सय्यद अकबर, नविद पटेल, मतिन मास्टर, सुफियान पटेल यांनी मुस्लिम बांधवांसमवेत मतदान केले.**



**पनवेल : माजी उपनराध्यक्ष मदन कोळी व कुटुंबीयांनी मतदानाचा हक्क बजावला.**



**पनवेल : नवमतदार कौस्तुभ प्रसाद हनुमंते याने पहिल्यांदा मतदान केले.**

# निवडक

## आदिवासींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**मुरूड** : भाजपचे तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त नांदगाव येथील वाघोबा आदिवासी वाडी, दांडा आदिवासी येथील आदिवासी बांधवांना प्रत्येक कुटुंबाला जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले. यामध्ये तांदूळ, साखर, चहा पावडर, गोडेतेल, मसाला आदी जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. या वेळी माजी सरपंच अशोक मुंबईकर, झहूर दळवी, सागर मेस्त्री, वीरू सुर्वे, क्षितीज कवळे, माजी मुख्याध्यापक मेघा कुलकर्णी, श्रवण राऊत आदी उपस्थित होते.

## सृष्टी खोतला मास्टर्स पदवी प्रदान

**रेवदंडा** : रेवदंड्यातील आदित्य मेडिकल स्टोअर्सचे संदिप खोत यांची स्नुषा सृष्टी आदित्य खोत



हिने अमेरिकेतील युनिव्ह युर्निव्हसिटीमधून इन्फॉर्मेशन सिस्टममध्ये मास्टर्स पदवी प्राप्त केली. तिच्या यशाचे कौतुक सर्व स्तरातून केले जात आहे. तिच्या कॉलेजचे डिन श्रीहरी व प्रेसिंडेंट हार्वी यांच्या हस्ते पदवी दिक्षांत सोहळा शुक्रवारी (दि. १०) ब्रिगहँमटोन-न्युर्याक येथे झाला. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाऊन पदवी प्राप्त करणारी सृष्टी आदित्य खोत ही रेवदंड्यातील पहिलीच महिला ठरते. तिच्या यशाचे कौतुक सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

## सुतारवाडी मार्गावर गुरांचा ठिय्या

**रोहा** : कोलाड-सुतारवाडीमार्गे विळे भागाड या मुख्य मार्गाच्या प्रवेशद्वाराजवळील चिंचवली येथील कालव्याच्या दोन्ही बाजूला नेहमीच मोकाट गुरांचा ठिय्या असतो. त्यामुळे या मार्गावरून वाहने चालवणे कठीण झाले आहे. विळे, एमआयडीसी भागात ये-जा करताना वाहनचालकांची दमछाक होते. रात्रीच्या वेळी ही मोकाट गुरे रस्त्याच्या मध्यभागी विश्रांती घेत असतात. त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवण्यात आहे. अवजड वाहनांखाली आल्यास गुरांच्याही जीवाला धोका आहे. त्यामुळे मोकाट गुरांना आपल्या गोठ्यात बांधून होणारा धोका टाळावा, अशी मागणी होत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गबाधित आक्रमक

## पांडापूर ग्रामस्थांनी काम रोखत प्रशासनाला धरले धारेवर

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गासाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यात न आल्याने संतप्त झालेल्या पेण तालुक्यातील पांडापूर ग्रामस्थांनी महामार्ग रोखून धरत प्रशासनाला धारेवर धरले. मागील १२ ते १३ वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे, मात्र महामार्गबाधित ग्रामस्थांच्या मागण्या प्रलंबित आहेत त्या मागण्या महामार्ग प्राधिकरण व शासनाकडून सोडवल्या जात नसल्याने पेण तालुक्यातील पांडापूर गावातील ग्रामस्थांच्या महामार्ग रुंदीकरणात जागा गेली आहे. या मागण्यांसंदर्भात शासनाकडे व महामार्ग प्राधिकरणाकडे वारंवार मागणी करूनदेखील या मागण्यांकडे शासनाने व महामार्ग प्राधिकरणाने लक्ष न दिल्याने येथील ग्रामस्थ आक्रमक झाले.

विविध मांगण्यांसंदर्भात महामार्ग रुंदीकरणाबाधित पांडापूर गावचे ग्रामस्थ मागील आठ वर्षांपासून शासनाकडे मांगणी करीत आहेत, परंतु शासन स्तरावरून दखल घेतली जात नसल्याने पांडापुर ग्रामस्थांनी महार्गाचे काम रोखण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शनिवारी महामार्गावर वाहतूक रोखून धरण्यात आली. याची दखल घेत पेणचे नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, राष्टीय महामर्ग प्राधिकरणाचे उपअभियंता विक्रांत कोरडे आदी अधिकारी यांनी पांडापूर येथे येऊन ग्रामस्थांची भेट घेतली. येथील मोऱ्या व भुयारी मार्ग कुठून द्यायचा, या जागेची पाहणी केली.

या मागण्यांसंदर्भात पुढील आठवड्यात बैठक आयोजित करण्यात येणार असून या बैठकीत ग्रामस्थांच्या मागण्यांसदर्भात काय कार्यवाही केली यांचा अहवाल सादर करावा अशा सूचना नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या व महामार्गाचे काम रोखू नये, अशी विनंती नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी ग्रामस्थांना केली.

ग्रामस्थांच्या ज्या मागण्या आहेत त्या वरिष्ठांकडे पोहोचविल्या जातील, तसेच येथील नालेसफाई केली जाईल व भुयारी मार्गाचे अंदाजपत्रक बनविण्यात येईल, असे या वेळी महामार्ग प्राधिकरण उपअभियंता विक्रांत कोरडे यांनी सांगितले.



# खंडाळे येथे आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघर्ष करा, आणि संघटित व्हा असा दिलेला संदेश आपल्या समाजातील मुलामुलींनी शैक्षणिक प्रगती करून आपल्या आई-वडिलांचे व गावाचे नाव उंच करावे असे मार्गदर्शन पंचशील बौद्ध मंडळ खंडाळे यांनी आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष मंगेश मोरे, उपाध्यक्ष वैष्णवी कदम उपस्थित होते. प्रा. जयपाल पाटील यांनी अपघातप्रसंगी १०८ रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा, आपली मुलगी बाळंतपणासाठी बाहेर आल्यावर तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी १०२ रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा, पावसाळा आता जवळ आल्याने काही वेळा वीजा कोसळतात. त्यासाठी केंद्र सरकारने दामिनी ॲप काढला असून सुरक्षेची माहिती मोबाईलवर कशी मिळते. महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलिसांचा ११२ क्रमांकाचा वापर कसा करावा, या माहितीसोबतच महिलांनी आपल्या घरातील गॅसची काळजी कशी घ्यावी, असे सांगितले. त्याचबरोबर विहाराच्या ग्रंथालयास संविधानाची प्रत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील पुस्तक, आपत्ती सुरक्षेची पुस्तके भेट दिली.

# खरवली-साले सर्व्हिस रोड व नाल्याचे काम पूर्ण करावे

■ युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर ते टेमपाले या टप्प्यावरील रस्ता काँक्रिटीकरणाचे काम संथ गतीने सुरू आहे. हॉटेल ओपन अंब्रेला, खरवली-साले फाटा येथील ओव्हरब्रीजच्या बाजूचे सर्व्हिस रोड व नाल्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे. त्यामुळे नागरिकांना रस्ता ओलांडताना कसरत करावी लागत आहे.

पावसाचे आगमन झाल्यास सर्व्हिस रोड व नाल्याच्या रखडलेल्या कामामुळे साले-खरवली पंचक्रोशीतील तसेच तळा तालुक्यात जाणाऱ्या वाहनचालकांसमोर गंभीर समस्या उभी राहणार आहे. त्यामुळे साले येथील सुरज सांगले, शिवसेना शाखाप्रमुख शैलेश जंगम यांनी व सहकाऱ्यांनी या रस्त्याचे, नाल्याचे काम लवकर मार्गी लागावे यासाठी शिवसेनेचे दक्षिण रायगड जिल्हा युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्याकडे संपर्क साधला.



युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी संबंधित कंपनीच्या व्यवस्थापक, कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी बोलावून परिस्थितीची पाहणी केली. ऐन पावसाळ्यात चालकांना कोणताही त्रास होता कामा नये याकरिता रखडलेले काम त्वरित पूर्ण करा अन्यथा साले ग्रामस्थांबरोबरच संपूर्ण विभागातील नागरिक कंपनीविरोधात तीव्र आंदोलन करतील, असा इशारा युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी कंपनीच्या व्यवस्थापकांना दिला.

खरवली-साले फाट्यावरील ओव्हरब्रीजच्या बाजूच्या सर्व्हिस रोड व नाल्याचे रखडलेले काम त्वरित सुरू करून पूर्ण करू जेणेकरून कोणालाही त्रास होणार नाही असे सकारात्मक आश्वासन कंपनीच्या वतीने व्यवस्थापक दत्ता मस्कर यांनी दिले. या वेळी दिपकशेठ चव्हाण, शरद भोनकर (साले ग्रामपंचायत सदस्य), संजय सांगले, शैलेश जंगम, नितेश जंगम, सूरज सांगले, चेतन सांगले, संदेश भोनकर, मिलिंद भोनकर, धोंडू राम भोनकर, प्रतिक भोनकर, मयूर भोनकर, सुमित भोनकर, नितीन भोनकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# बेलोशीतील महिला होताहेत स्वयंसिद्धा

## गेल इंडिया कंपनीतर्फे स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल इंडिया लिमिटेड, उसर यांच्या वतीने बेलोशी पंचक्रोशीतील महिला व मुलींसाठी पाच दिवसीय मोफत स्वयंसिद्धा स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल मुख्य महाप्रबंधक अनुप गुप्ता, महाप्रबंधक जितिन सक्सेना, मुख्य प्रबंधक शितल लाकरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच कृष्णा भोपी यांच्या हस्ते झाले.

या वेळी वरिष्ठ अधिकारी अपूर्व निंबाळकर, सहाय्यक अधिकारी सुजन ठाकूर, माजी ग्रमापंचायत सदस्य गिरीश पाटील, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्ष तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्वयंसिध्दा प्रशिक्षिका निकी बेंडे, सुचिता साळवी, अश्विनी पारधी, स्नेहा मानकर, प्रणाली तळेगावकर, सीआरपी दर्शना चौगुले, सानिका जाधव, अंगणवाडी सेविका ममता गायकर, मदतनीस सिद्धी भोपी आदी उपस्थित होते.



महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

माजी सरपंच ग्रामपंचायत बेलोशी कृष्णा रामभाऊ भोपी यांनी या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

गेल इंडिया लिमिटेड उसरचे वरिष्ठ अधिकारी अपूर्व निंबाळकर यांनी या प्रशिक्षणाची आवश्यकता सांगितली तर प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष नंदकुमार गोंधळी यांनी या पाच दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये कशाप्रकारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे, याविषयी मार्गदर्शन केले.

# ग्रामीण भागात क्रिकेटचा थरार

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागात क्रिकेटचा थरार रंगत असून विजेत्या संघांसाठी आयोजकांकडून लाखोंची बक्षिसे लावण्यात येत आहेत. मे महिन्याची सुट्टी पडल्याने शहरात नोकरीसाठी स्थलांतरित झालेले तरुण मोठ्या संख्येने आपल्या गावी परतले आहेत. यामुळे ग्रामीण भागात सर्वत्र क्रिकेटचे सामने आयोजित केले जात आहेत.

गावातील सरपंच ते मोठा नेता व पुढारी यासाठी बक्षिसांची रक्कम किंवा पूर्ण स्पर्धेचे आयोजन करतात. या स्पर्धांमुळे गाव खेड्यातील प्रतिभावंत व होतकरू खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ व थोडेफार आर्थिक पाठबळदेखील मिळत आहेत. गावागावातील मैदाने किंवा शेतात या स्पर्धा भरविल्या जातात. त्यासाठी मंडप बांधले जातात.

चांगले निवेदक बोलविले जातात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच यासाठी नेमले जातात, तसेच यावेळी मंडप व डेकोरेशन, वडापाव, सरबत, पाणीविक्रेते आदी व्यावसायिक व विक्रेत्यांचादेखील चांगला व्यवसाय होतो.



**खोपोली : वरची खोपोली येथील ज्येष्ठ नागरिक सुमती रहाळकर यांनी वयाच्या ९९व्या वर्षी मतदार केंद्रावर जाऊन त्यांनी मतदानाचा हक्क बजावला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रोहित कुलकर्णी यांनी त्यांना मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी मदत केली.**

# लसणाचे दर अद्याप चढेच

**रायगड : रामप्रहर वृत्त**


मागील वर्षापासून लागवड कमी असल्याने लसणाचे उत्पादन कमी आहे. गेल्या वर्षीही लसणाच्या दराने उच्चांक गाठला होता. यंदाही नवीन लसूण दाखल होईपर्यंत वर्षभर लसणाचे दर चढेच राहणार आहेत. एपीएमसी बाजारात सध्या देशी लसूण प्रतिकिलो ५०-१२० रुपये तर उटी लसणाची १००ते २५० रुपयांनी विक्री होत आहे. नवीन लसूण दाखल झाल्यानंतरच लसणाचे दर आवाक्यात येतील अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. एप्रिल २०२३नंतर लसणाची आवक कमी झाल्याने दराने उच्चांक गाठला होता, मात्र जुलै २०२३ पासून लसणाच्या दरात सातत्याने वाढ झाली होती.

# खोपोलीत आंबा बाजार तेजीत

## अलिबाग, वरसई येथील 'हापूस'ला सर्वाधिक पसंती

**खोपोली : प्रतिनिधी**

एप्रिल महिन्यात आंब्याचा हंगाम सुरू झाल्यापासून जून महिन्याच्या मध्यापर्यंत खोपोलीतील बाजारपेठमधील हनुमान मंदिर परिसरात खास आंबा बाजार भरतो. पहाटे ५ वा. पासून साधारण ११ वा. पर्यंत येथील आंबा खरेदी-विक्री व्यवहार चालतात. कर्जत, पेण, अलिबाग, राजापूर, रत्नागिरीसह कर्नाटक हापूस आंबा येथे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध असतात. यावर्षी येथे अलिबाग व पेण तालुक्यातील वरसई भागातील हापूस व केशर आंबा मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी दाखल होत आहे.




रत्नागिरीपाठोपाठ स्थानिक हापूस आंब्याला नागरिकांची पसंती मिळत आहे. येथे आंब्याचे किरकोळ व होलसेल असे दोन दर असतात. त्यातही आकारानुसार दर निश्चित आहेत. कच्च्या आंब्याचे किरकोळ विक्रीसाठी २५० रु.पासून ३५० रु.प्रति डझन तर पिकलेल्या आंब्यासाठी २०० ते ३५० रु.प्रति डझन असे दर आहेत- चार डझन व त्यावरील होलसेल खरेदीसाठी कच्च्या आंब्याचे दर २०० ते ३०० रुपये प्रति डझन तर पिकलेल्या आंब्यासाठी हे दर १५० रु. पासून ३०० रुप्रति डझन असे आहेत.

होलसेल खरेदीसाठी अलिबाग तालुका व पेण तालुक्यातील वरसई भागातील कच्च्या आंब्याला मोठी आवक होत असल्याने खरेदीसाठी नागरिकांची पसंती मिळत आहे.

मागील आठवड्यापासून येथील बाजारपेठेतील हनुमान मंदिर आंबा बाजारात पहाटे ५ ते सकाळी ८ वा.पर्यंत दररोज आंबा खरेदी व विक्रीसाठी मोठी गर्दी होत असून या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत आहे. या आंबा बाजारातून होलसेल खरेदी करून स्थानिक गरजू कुटूंब खासकरून महिला वर्ग शहरातील गल्लोगल्ली व रहिवासी सोसायट्यांमध्ये जाऊन आंबा विक्री करतात.

# मुरूड व काशीद समुद्रकिनारे पर्यटकांनी हाउसफुल्ल

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने पर्यटकांची पाऊले आपोआप समुद्रकिनारी वळत असतात. शनिवार- रविवारी शेकडोंच्या संख्येने विविध जिल्ह्यातून पर्यटक मुरूड व काशीद समुद्रकिनारी दाखल झाले होते. पर्यटकांनी मनोसक्त समुद्रात पोहण्याचा तर काही जण घोडागाडीतून तर बाईक राईडचा आनंद लुटला. यामुळे लॉजिंग, हॉटेल व्यावसायिक, टपरीधारकांचा व्यवसाय ही झाला.

गेल्या महिन्यांपासून परीक्षेचा हंगाम आणि उन्हाच्या तीव्र झळा यामुळे समुद्रकिनारी पर्यटकांनी पाठ फिरविली होती. त्यामुळे समुद्रकिनारी असणारे व्यावसायिकही चिंतेत होते. यानंतर मात्र मे महिन्याच्या सुरुवातीपासून पर्यटकांनी येण्यास सुरुवात केली आहे. काशीद येथे तर तुफान गर्दी पर्यटकांनी केली.



# आरसीबीचा सलग पाचवा विजय

## दिल्ली कॅपिटल्सचा धुव्वा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध झालेल्या सामन्यात ४७ धावांनी सलग पाचवा विजय मिळवला. यासह त्यांनी आपल्या प्ले ऑफच्या आशा कायम ठेवल्या. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने रजत पाटीदारच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर १८७ धावा केल्या होत्या. त्यानंतर त्यांनी दिल्लीला १४० धावांवर रोखत विजयावर शिक्कामोर्तब केले.

आरसीबीने दिलेल्या १८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने ३० धावांत चार विकेट्स गमावल्या होत्या. असे असतानाही संघाने पॉवर प्लेच्या षटकांत ५० धावांचा टप्पा पार केला. अशा स्थितीत होप आणि अक्षर पटेल यांच्यात ५६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली, पण १०व्या षटकात लॉकी फर्ग्युसनने होपला २९ धावांवर बाद केले. यानंतर ११व्या षटकात केवळ तीन धावा काढून ट्रिस्टन स्टब्स बाद झाल्याने दिल्लीचा संघ अडचणीत आला. आता संघाकडे एकही फलंदाज उरला नव्हता.



अक्षर पटेल एका टोकाकडून गड लढवत होता, तर दुसऱ्या बाजूने विकेट पडत होत्या. पंधराव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रसिख दार सलाम १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. शेवटी दिल्लीचा संघ १४० धावांवर ऑलआऊट झाला.

तत्पूर्वी नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २० षटकांत नऊ गडी गमावून १८७ धावा केल्या होत्या. बंगळुरूसाठी रजत पाटीदारने ५२ धावांची, तर विल जॅकने ४१ धावांची खेळी साकारली. दिल्लीकडून खलील अहमद आणि रसिख दार सलाम यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर इशांत शर्मा, मुकेश कुमार आणि कुलदीप यादव यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

### बंगळुरू संघाच्या प्ले ऑफ आशा कायम

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे १३ सामन्यांत सहा विजय आणि सात पराभवांसह त्यांचे १२ गुण आहेत. दिल्लीवरील विजयासह संघ पाचव्या स्थानावर पोहचला आहे. आरसीबीला शेवटचा सामना १८ मे रोजी चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध चिन्नास्वामी येथे खेळायचा आहे. या सामन्यावर दोन्ही संघांचे भवितव्य अवलंबून असेल. चेन्नई जिंकल्यास आरसीबी प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडेल. त्याचवेळी आरसीबी जिंकल्यास त्यांना चांगल्या फरकाने जिंकावे लागेल, जेणेकरून नेट रनरेट चेन्नईपेक्षा चांगले होऊ शकेल. यानंतरही त्यांना इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागणार आहे.

# विराट कोहलीने रचला इतिहास!

## आयपीएलमध्ये एका संघाकडून २५० सामने खेळणारा ठरला पहिला क्रिकेटर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आपल्या नावावर एक मोठा विक्रम नोंदवला. आयपीएलमध्ये कोणत्याही एका संघाकडून २५० सामने खेळणारा विराट पहिला क्रिकेटर ठरला आहे. दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात त्याने ही कामगिरी केली.

आयपीएल या स्पर्धेला २००८मध्ये सुरुवात झाली. विराट कोहली आयपीएलच्या पहिल्या सत्रापासून आरसीबीकडून खेळत आहे. आयपीएलमध्ये २५० सामने खेळणारा तो एकूण चौथा खेळाडू ठरला आहे. विराटच्या आधी महेंद्रसिंह धोनी (एमएस धोनी) आयपीएलमध्ये २६३ सामने खेळला होता.



धोनीनंतर रोहित शर्मा दुसरा खेळाडू आहे. मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहितने आयपीएलमध्ये २५६ सामने खेळले आहेत, तर आरसीबीचा यष्टिरक्षक दिनेश कार्तिक २५५ आयपीएल सामने खेळून तिसऱ्या क्रमांकावर आहे.

विराट कोहलीने आरसीबीसाठी २५० आयपीएल सामन्यांमध्ये ७९०६ धावा केल्या आहेत, ज्यात आठ शतके आणि ५५ अर्धशतकांचा समावेश आहे. विराटने आयपीएलमध्ये १३१.६८च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याची सरासरी ३८.७५ इतकी आहे. आयपीएलच्या चालू हंगामात विराटने १३ सामन्यांमध्ये सर्वाधिक ६४३ धावा केल्या आहेत, ज्यात एक शतक आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे.

# प्रज्ञानंदची दिग्गज कार्लसनवर मात

**वॉरसॉ : वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सुपरबेट जलद आणि अतिजलद बुद्धिबळ स्पर्धेत विश्वातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनवर मात केली. या विजयानंतरही तो तिसऱ्या स्थानीच राहिला. कार्लसनच्या पराभवामुळे गुणतालिकेत अग्रस्थानी असलेल्या चीनच्या वे यीची आघाडी आता २.५ गुणांनी वाढली आहे.

या स्पर्धेतील अतिजलद प्रकाराच्या नऊ फेऱ्या शिल्लक असून वे यी एकूण २०.५ गुणांसह अग्रस्थानावर आहे. अतिजलद प्रकारात पहिल्याच दिवशी त्याने नऊपैकी सात लढतींत विजय नोंदवले. जलद प्रकारातही तोच विजेता ठरला होता. त्याला रोखणे अन्य बुद्धिबळपटूंना आता अवघड जाणार आहे. ही स्पर्धा ग्रँड चेस टूरचा भाग आहे.

कार्लसन आता १८ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. प्रज्ञानंदकडून झालेल्या पराभवामुळे तो अग्रस्थानापासून आणखी दूर गेला आहे. अतिजलद प्रकारात प्रज्ञानंद कार्लसनविरुद्ध नेहमीच चांगली कामगिरी करताना दिसतो. कार्लसनवरील विजयानंतर प्रज्ञानंदचे १४.५ गुण झाले आहेत. भारताचाच अर्जुन एरिगेसी १४ गुणांसह चौथ्या व पोलंडचा यान-क्रिस्टोफ डुडा १३ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. त्याखालोखाल नोदिरबेक अब्दुसत्तोरोव (१२.५ गुण), व्हिन्सेन्ट केमेर (११.५), किरिल शेवचेन्को (११) आणि अनिश गिरी (१०.५) यांचा क्रमांक लागतो.

जगज्जेतेपदाच्या लढतीसाठीचा आव्हानवीर असलेल्या भारताच्या डी. गुकेशला मात्र या स्पर्धेत अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. तो ९.५ गुणांसह गुणतालिकेत तळाला आहे.

# विराटचा अंपायरशी वाद

**नवी दिल्ली** : आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने विजय मिळवला. या सामन्यादरम्यान बंगळुरूचा खेळाडू विराट कोहली अंपायरशी भिडला.

वास्तविक, ही घटना दिल्लीच्या फलंदाजीदरम्यान दुसऱ्या षटकात घडली. या षटकात बंगळुरूचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने पहिल्याच चेंडूवर इन-स्विंगिंग यॉर्कर टाकला, ज्यावर अभिषेक पोरेलने त्याची बॅट खाली केली. यावर मैदानावरील अंपायरनी नॉट आऊट दिल्यानंतर आरसीबीने रिव्ह्यू घेतला. रिव्ह्यू पाहिल्यानंतर थर्ड अंपायरनी चेंडू अभिषेक पोरेलच्या बॅटला लागल्याचे सांगितले. अशा स्थितीत अभिषेक पोरेलला नॉट आऊट घोषित करण्यात आले. त्यामुळे थर्ड अंपायरनी हा निर्णय दिल्ली कॅपिटल्सच्या बाजूने दिला. यानंतर विराट कोहली आणि आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिस या निर्णयावर खूश नव्हते. त्यामुळे विराट आणि प्लेसिस यांनी यावर अंपायरशी दीर्घ चर्चा केली. या दरम्यान विराट मैदानावरील अंपायरशी वाद घालतानाही दिसला.

# राजस्थान रॉयल्सच्या पराभवाची हॅट्ट्रिक

## चेन्नईचा विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

येथील एमए चिदंबरम स्टेडियमवर आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना खेळला गेला. या सामन्यात चेन्नईने राजस्थानवर पाच विकेट्सनी मात करीत प्ले ऑफच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. त्याचबरोबर राजस्थान रॉयल्सचा हा सलग तिसरा पराभव आहे. त्यामुळे राजस्थान रॉययल्सच्या अडचणी काही प्रमाणात वाढल्या आहेत.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने चेन्नईसमोर १४२ धावांचे लक्ष्ये ठेवले. प्रत्युत्तरात चेन्नईने १९ षटकांत पाच गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह चेन्नई घरच्या मैदानावर विजयाचे अर्धशतक पूर्ण केले. कर्णधार ऋतुराज गायकवाडने संघासाठी सर्वाधिक ४१ चेंडूंत एक चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ४२ धावा केल्या. या दरम्यान राजस्थानकडून रविचंद्रन अश्विनने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय राजस्थान रॉयल्सच्या बाजूने नव्हता. संघाला निर्धारित २० षटकांत पाच गडी गमावून केवळ १४१ धावांपर्यंत मजल मारता आली. रियान परागने सर्वाधिक ३५ चेंडूंत नाबाद ४७ धावा केल्या. चेन्नईकडून सिमरजीत सिंगने सर्वाधिक तीन बळी टिपले.

# विराटने डिवचले, इशांतने बाद करून दिले उत्तर!



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवरील सामन्यात विराट कोहली आणि इशांत शर्मा हे दोन जुने मित्र आमनेसामने आले. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळणाऱ्या विराटला दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या इशांतने झेलबाद केले. तत्पूर्वी विराटने इशांत डिवचले होते. याचा बदला इशांतने विराटला बाद करून घेतला व त्यालाही खिजवले.

यंदाच्या आयपीएलमध्ये विराट जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. दिल्लीविरुद्धच्या सामन्यातही त्याने शानदार सुरुवात केली. तो मैदानाच्या चारही कोपऱ्यात फटके खेळत होता. इशांतच्या ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूने विराटच्या बॅटची कडा घेतली आणि अभिषेक पोरेलच्या हातात विसावला. इशांतने विराटला टी-२०मध्ये पहिल्यांदाच बाद केले आहे.

विराटला बाद केल्यानंतर इशांत शर्माच्या आनंदाला पारावार उरला नाही. मित्राला चिडवण्याची संधी मिळण्यापेक्षा आनंदाची गोष्ट कोणती असू शकते? इशांतने ही संधी सोडली नाही आणि विराटला खिजवण्यासाठी त्याच्या जवळ गेला. त्या वेळी विराटने त्याला धक्का दिला. यानंतर दोघे एकमेकांकडे पाहून हसू लागले.

आऊट होण्यापूर्वी विराटनेही इशांत शर्माला चिडवले होते. विराटने पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर इशांतविरुद्ध षटकार ठोकला. त्यानंतर विराटने बाद झालेल्या ओव्हरच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारला. या वेळी तो इशांतजवळ जाऊन काहीतरी बोलला. त्यानंतर विराटच्या बॅटमधून षटकार आला आणि त्याने पुन्हा इशांतकडे बोट दाखवले, पण शेवटी इशांतने बाजी मारली.

# रवींद्र जडेजा विचित्र पद्धतीने धावबाद

## व्हिडीओ व्हायरल

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामातील ६१व्या सामन्यात एक विचित्र घटना पाहायला मिळाली. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्जचा अनुभवी फलंदाज रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळताना विचित्र पद्धतीने धावबाद झाला.

रवींद्र जडेजाने आवेश खानचा चेंडू थर्ड मॅनच्या दिशेने खेळला. यानंतर त्यांचा ऋतुराज गायकवाडसोबत धाव घेताना ताळमेळ नीट भसला नाही आणि जडेजा अडचणीत आला. त्याला दुसरी धाव घ्यायची होती, पण ऋतुराजने त्याला माघारी पाठवले. दरम्यान, यष्टीरक्षक संजू सॅमसनने नॉन स्ट्रायकर एंडला थ्रो केला. चेंडू स्टंपऐवजी जडेजाच्या पाठीवर लागला. तो स्टंपसमोर होता. अंपायरनी जडेजाची चूक असल्याचे सांगून त्याला 'ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड' नियमानुसार धावबाद घोषित केले, ज्यानंतर जडेजा निराश दिसला आणि त्याने अंपारशी चर्चा केली, मात्र अंपायर आपल्या निर्णयवार ठाम राहिले. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल



होत आहे.

आयपीएलच्या इतिहासात तिसऱ्यांदा 'ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड' नियमानुसार फलंदाज बाद झाला आहे. जडेजापूर्वी २०१३मध्ये युसूफ पठाण आणि २०१९मध्ये अमित मिश्रा अशाप्रकारे बाद झाले होते. कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळताना युसूफ पठाण रांचीमध्ये पुणे वॉरियर्स इंडियाविरुद्ध क्षेत्ररक्षणात अडथळा आणल्याने बाद झाला होता. त्याचवेळी दिल्ली कॅपिटल्ससाठी अमित मिश्रा २०१९मध्ये विशाखापट्टणममध्ये सनरायझर्स हैदराबादविरुद्ध या नियमानुसार बाद झाला होता.

### काय आहे नियम?

मेरीलेबोन क्रिकेट क्लब या क्रिकेटचे नियम बनवणाऱ्या संस्थेने 'ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड' नियम खेळाडूंना आऊट घोषित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. लॉर्ड्स क्रिकेटच्या वेबसाइटवर नियम ३७मध्ये याचा उल्लेख आहे. नियम ३७.१.१नुसार कोणताही फलंदाज जेव्हा चेंडू खेळल्यानंतर तो विरोधी संघाच्या क्षेत्ररक्षकांच्या कामात जाणीवपूर्वक अडथळा आणतो, तेव्हा तो क्षेत्ररक्षणात अडथळा आणतो. जर त्याने आपल्या शब्दातून किंवा कृतीतून असे केले, तर त्याला घोषित केले जाते.

# इंग्लंडचा लिव्हिंगस्टन आयपीएल सोडून मायदेशी

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमिअर लीगनंतर काही दिवसांतच ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू होणार आहे. त्यामुळे आयपीएलसाठी भारतात आलेल्या परदेशी खेळाडूंची पाऊले हळूहळू मायदेशाकडे वळत आहेत. इंग्लंडचे खेळाडू प्ले ऑफसाठी उपलब्ध नसतील हे आधीच इंग्लंड क्रिकेट बोर्डाने स्पष्ट केले आहे. तरीही बीसीसीआयने त्यांना खेळाडूंना स्पर्धा होईपर्यंत खेळण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केल्याचे वृत्त आहे. अशातच इंग्लंडचा स्टार ऑल राऊंडर लिएम लिव्हिंगस्टन याने मायदेशात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

लिव्हिंगस्टन आयपीएल २०२४च्या प्लेऑफपूर्वी गुडघ्याच्या दुखापतीवर उपचार करण्यासाठी आणि युनायटेड स्टेट्स आणि वेस्ट इंडिजमध्ये होणाऱ्या वर्ल्ड कप स्पर्धेपूर्वी तंदुरुस्त होण्यासाठी मायदेशी रवाना झाला आहे. लिव्हिंगस्टन गेल्या काही वर्षांपासून स्नायूंच्या दुखापतींचा सामना करीत आहे आणि या हंगामात सुरुवातीचे दोन सामनेदेखील तो खेळला नव्हता.

पंजाब किंग्सकडून खेळणाऱ्या लिव्हिंगस्टनने आयपीएलच्या या मोसमात फक्त सात सामने खेळले आहेत आणि आता तो ट्वेंटी-२० वर्ल्डकपच्या तयारीसाठी इंग्लंडला परतला आहे. पंजाबचे अजून दोन सामने बाकी आहेत. आयपीएल आणखी एक पर्व पूर्ण झाले. आगामी वर्ल्डकप स्पर्धेसाठी माझा गुडघा बरा करावा लागणार आहे. पंजाब किंग्जच्या चाहत्यांना त्यांच्या सर्व प्रेम आणि समर्थनासाठी पुन्हा एकदा धन्यवाद. एक संघ म्हणून आणि वैयक्तिकरित्या हा निराशाजनक हंगाम राहिला. असे त्याने इंस्टाग्रामवर लिहिले. पंजाब किंग्स हा प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणाऱ्या संघांपैकी एक आहे. त्यांचा कर्णधार शिखर धवनदेखील दुखापतीमुळे काही सामने खेळू शकला नाही.

# सलग तिसऱ्या पराभवानंतर राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसन नाराज

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १७व्या हंगामातील ६१वा सामना रविवारी चेपॉक स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चेन्नई घरच्या मैदानावर राजस्थानचा पाच विकेट्सनी पराभव करीत प्ले ऑफमध्ये पोहचण्याचा दावा मजबूत केला, मात्र राजस्थान रॉयल्सचा यंदाच्या हंगामातील हा सलग तिसरा पराभव आहे. सध्या राजस्थानचा संघ १२ सामन्यांत १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. प्लेऑफमध्ये पोहचण्यासाठी त्यांना विजय आवश्यक आहे. संघाच्या सलग तीन पराभवानंतर कर्णधार संजू सॅमसन खूपच निराश दिसत होता. या पराभवासाठी त्याने फलंदाजांना जबाबदार धरले.

राजस्थान संघाने या हंगामात आतापर्यंत चार सामने गमावले आहेत. त्यात गुजरात टायटन्सविरुद्ध घरच्या मैदानावर फक्त एकच सामना हरला आहे. त्यानंतर आता विरोधी संघाच्या मैदानावर त्यांचा सलग तिसरा पराभव आहे. या पराभवानंतर कर्णधार संजू सॅमसन म्हणाला, मला वाटते पॉवरप्लेनंतर विकेट संथ आणि



दुहेरी होती. त्यामुळे पॉवरप्लेनंतर आम्हाला १७० धावांची अपेक्षा होती, मात्र आम्ही २०-२५ धावा कमी केल्या. सिमरजीतने खरोखरच चांगली गोलंदाजी केली.

विरोधी संघांच्या मैदानावर लागोपाठ तीन पराभवांबाबत सॅमसन म्हणाला, दुसऱ्या संघाच्या मैदानावरील सामन्यातून काय अपेक्षा ठेवाव्यात याची आम्हाला खात्री नव्हती. आम्हाला वाटले की प्रथम फलंदाजी करणे हा एक चांगला पर्याय आहे. इथे खेळायची सवय असल्याने सीएसकेला धावाचा पाठलाग कसा करायचा याची चांगली कल्पना होती. आम्हाला वाटले की दुसऱ्या डावात वेग कमी होईल, पण खेळपट्टी चांगली होती.

चेन्नईच्या हवामानाबाबत सॅमसन म्हणाला, तुम्ही रात्री खेळता तेव्हा दव असल्यामुळे पाठलाग करणे कठीण नसते. उन्हाळ्यात खेळपट्टी गरम होते त्यामुळे दुसऱ्या डावात खेळपट्टी संथी होईल, अशी मला अपेक्षा होती. प्लेऑफ्सबद्दल विचार करणे सामान्य आहे. आम्हाला आमच्या नियंत्रणात काय आहे यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मी माझ्या सहकाऱ्यांना सांगू इच्छितो की, आपल्या हातात असलेल्या गोष्टींवर आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे आणि पुढील सामना जिंकण्याची आशा आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com